जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## मानवा... अजब तुझे रसायन –

माणूस... खरं तर माणूस ही चीज कळायला तशी अवघडच! एखादी व्यक्ती कद्रू, चिक्कू, कृपण आहे आहे असा आपण तिच्यावर शिक्का मारलेला असावा तर तिने एखाद्या सत्कार्याला फार मोठी देणगी, स्वतःला न परवडतानाही दिल्याचे कुणीतरी येऊन सांगते.

एखाद्या रूक्ष, माणूसघाण्या, तुसड्या माणसाच्या घरी जावे तर त्याच्याकडे श्रेष्ठ गायकांच्या मैफलींच्या अनेक कॅसेटस् मोठ्या प्रेमाने, जिव्हाळ्याने जमवून जपून ठेवल्याचे दिसून येते.

जो अभ्यासाच्या पुस्तकांना कधीतरी हात लावेल असे की नाही अशी मला वारंवार शंका येई, असा माझा एक विद्यार्थी एम.ए. करतो काय, एकदा सहज विषय निघाला असता आयन रॅण्ड या लेखिकेच्या 'फाऊंटनहेड' या गाजलेल्या कादंबरीबद्दल इतक्या मार्मिकतेने रसिकतेने व जाणकारीने बोलला की मी थक्कच होऊन गेले तर स्वतः देव न मानणाऱ्या एका गृहस्थांनी आपल्या दूरच्या नात्यातल्या एका वृद्ध स्त्रीला परवडत नव्हते तरी आपल्या खर्चाने तिच काशीयात्रा घडवून आणली.

चांगल्या माणसांचे वाईटपण जाणवत राहाते, वाईट माणसांचे चांगलेपण निदर्शनाला येते. चांगल्यात वाईट दडलेले असते, वाईटात चांगले लपलेले असते. हा अंधार उजेडाचा, ओळख अनोळखीचा खेळ सारखा चालू असतो.

इतरांचे जाऊ द्या! आपली आपल्याला तरी पुरती व अचूक ओळख पटलेली असते का? ओळख–अनोळखीचे अद्‌भूत रसायन म्हणजेच शेवटी माणूस, की काय?

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१




# विवाह सोहळ्यातून दागिने, रोकड असलेल्या पर्सची चोरी

नगर – नातेवाईकांच्या लग्नासाठी नाशिक येथून नगर शहरातील सिटी लॉन्स येथे आलेल्या महिलेची पर्स चोरट्याने लांबविली. या पर्समधील सुमारे चार तोळ्याचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल असा १ लाख २६ हजार रूपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. बुधवारी (दि.१३) रात्री ९.४० वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

या प्रकरणी गुरूवारी (दि.१४) तोफखाना पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सोहेल बशीर शेख (वय ४२, रा. नाशिक) यांनी फिर्याद दिली आहे. ते पत्नी यास्मिन यांच्यासह नातेवाईकांच्या लग्नासाठी बुधवारी सायंकाळी छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील सिटी लॉन्स येथे आले होते. लग्न कार्यक्रम झाल्यानंतर यास्मिन यांनी त्यांच्याकडील पर्समध्ये त्यांचे २० ग्रॅमचे मंगळसूत्र, १६ ग्रॅमच्या कानातील रिंगा, टॉप्स व मुरणी, पाच ग्रॅमचे सोन्याची चेन, एक हजाराची रोकड व मोबाईल असा १ लाख २६ हजार रूपयांचा ऐवज ठेवला होता. फिर्यादी, त्यांची पत्नी यास्मिन व इतर नातेवाईक जेवण करण्यासाठी हॉलमध्ये बसलेले असताना यास्मिन यांनी पर्स त्यांच्या जवळ ठेवली होती. त्यावेळी ३० ते ३५ वर्षीय एका तरूणाने सदरची पर्स चोरली.

ही घटना फिर्यादी व इतरांच्या लक्षात आली असता त्यांनी त्याचा पाठलाग केला. परंतू तो गर्दीचा फायदा घेऊन पसार झाला. त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

# पिक अप गाडी चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्याला पकडले

नगर – शहरातील बूथ हॉस्पिटल समोर रस्त्याच्या कडेला उभी केलेली महिंद्रा कंपनीची बोलेरो पिक अप गाडी चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्याला चालकाने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. गुरुवारी (दि.१४) पहाटे ही घटना घडली.

बद्री आलम मंजूर शेख (वय ४०, रा.जोगेश्वरी वेस्ट, मुंबई) असे या चोरट्याचे नाव आहे. याबाबत शाहबाज नासीर पठाण रा. वाळकी, ता.नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चालक पठाण यांनी त्यांची पिक अप गाडी ही लॉक करून बूथ हॉस्पिटल समोर रस्त्याच्या कडेला उभी केलेली होती.

गुरुवारी (दि.१४) पहाटे ४.३० च्या सुमारास आरोपी बद्री आलम शेख हा पान्ह्याच्या सहाय्याने गाडीच्या दरवाजाचे लॉक तोडत असल्याचे निदर्शनास आले. त्याला पठाण यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने पकडले. याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आल्यावर कोतवाली पोलिस घटनास्थळी गेले व त्यांनी आरोपीला ताब्यात घेत त्याच्यावर पोलिस ठाण्यात चोरीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.

# लोकप्रतिनिधींची तुम्हाला दहशत न वाटता लोकप्रतिनिधींना तुमची दहशत वाटली पाहिजे...




व्यंगचित्र सुहास मुळे
9002668555

## योग्य उमेदवार, मतदार जागृती अभियान...

मतदार बंधू आणि भगिनींनो.....

आपल्या शहरावर आपलं एकतर्फी का होईना प्रेम बसावं, एक जबाबदार जागरूक नागरिक म्हणून विकासामध्ये आपलाही थोडा खारीचा वाटा असावा.. यासाठी आय लव्ह नगर, आय लव्ह पुणे, असे संकल्पित उपक्रम काही जागरूक नागरिकांकडून राबवले जातात.. परंतु ते लव्ह सुद्धा फिल्मी लव्ह असल्यासारखेच असते... सिग्नल न पाळण्यामधे मर्दानगी समजणे, कचरा गाडी रोज दारात येत असताना रस्त्यावर टाकणे, नगरपालिकेच्या नळाचा कनेक्शनवर मोटार जोडून बंगल्याच्या कंपाऊंडच्या भिंती सुद्धा धुवून काढणे, रस्त्यावर पाणी पाणी करणे.. असे अडाणी सुशिक्षित, मतदानाच्या दिवशी घरातली मते मोजून त्याप्रमाणे एखाद्या उमेदवाराकडून गुलाबी पाकिट येतं की नाही? याची संध्याकाळी पाच वाजेपर्यंत वाट पाहत बसणे असे श्रीमंत भिकारी,.. आणि तसं काही पाकीट आलं नाही तर मतदानाचं न करणे..

हीच माणसं सगळ्या गैरव्यवस्थेला कारणीभूत आहेत.. काही सन्माननीय अपवाद वगळता.. अडाणी, असंस्कृत आणि अजिबात दूरदृष्टी नसलेल्या उमेदवारांमुळेच आपल्या शहराचा आज पर्यंत खेळ खंडोबा झाला आहे, काही सन्माननीय अपवाद त्यामध्ये निश्चित आहेत.

तसं पाहायला गेलं तर आपलं शहर इतर शहरांच्या तुलनेमध्ये कितीतरी छोटं आहे. एखाद्या शहराच्या समस्या असून असून काय असतात?

मूलभूत गरजा किती फुटकळ असू शकतात? परंतु तरीही वॉटर मीटर आणि गटर या तीनच गोष्टींमध्ये आपण वर्षानूवर्षे अडकून पडलेलो जर असु.. आपण प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत देखील जायला तयार नाही तर आपण पदवीधर कधी होणार? असे जर असेल तर इतर शहरांसारखे औद्योगिक क्रांतीचे, व्यावसायिक क्रांतीचे, सुंदर रस्त्यांचे उद्यानांचे शहर हे आपल्यासाठी दिवास्वप्नच ठरणार नाही का?

मित्रांनो...पक्षाचा राजकारण चाललं तर देश आणि राज्य पातळीवर चालू शकतं, पण आपल्याला रोज ज्या समस्यांना तोंड द्यावं लागतं त्या स्थानिक गल्लीबोळांमध्ये कसला आलाय पक्ष? तिथे तर लोकप्रतिनिधी असलेल्या माणसाचा व्यक्तिगत अभ्यास करूनच पक्षभेद, जातीभेद, विसरूनच कार्यक्षम आणि इच्छाशक्ती दूरदृष्टी असलेल्या उमेदवारालाच आपण मतदान करायला हवं.. नाहीतर ते निवडून आल्यानंतर मग रोज तुमची समस्या घेऊन जाऊन बसा त्यांच्या ऑफिसवर तासन तास त्यांची वाट पहा.. त्यांचे पीए म्हणतील की साहेब अजून उठले नाहीत, आता आंघोळ करत आहेत, येतील अजून एक तासाने आल्यानंतर त्यांना वेळ झाला तर बोलतील..

मित्रांनो...आपल्या शहराला काही शाप वगैरे आहे की काय? अशी शंका यायला लागते.. या मातीचा गुणधर्म काम न करता नुसतं योजनांच्या नावाखाली कोटीच्या कोटी उड्डाणं आणि टक्केवारी कमिशन पैसे खाणं..एवढाच शाप आहे का? आपली पण अवस्था तुझं माझं जमेना आणि तुझ्या वाचून करमेना अशी झालेली आहे. सामान्यपणे लोक चर्चा करताना बोलतात की, मग सज्जन प्रामाणिक कार्यक्षम तळमळीचा सुशिक्षित असा उमेदवार आम्हाला मिळत नाही तर आम्ही काय करायचं? तर या प्रश्नाचे उत्तर आहे की असा सर्वगुणसंपन्न उमेदवार मिळू शकत नाही असं नाही पण आपणच त्याला सुरुवातीपासूनच उमेदवार म्हणून स्वीकारत नाही तर त्याच्यापुढे चे काय बोलायचे?

मित्रांनो...रात्र वैऱ्याची आहे, निवडणुकीला तुम्ही एवढ्या सहजपणे आणि निष्काळजीपणे घेऊ नका..आपल्या लोकशाहीचा तो खऱ्या अर्थाने श्वास आहे.. योग प्राणायाम करायचा का? व्हेंटिलेटर वर जायचं हे तुम्ही ठरवा...स्वतः विचार करा आणि चर्चा करायला बसलाच तर इतरांनाही विचार करायला भाग पाडा... आपल्याला कितीही जणांकडून काहीही लालूच दाखवलेली असली तरी.. काही नोटा स्वीकारल्या असल्या तरी.. आपला परिसर आपलं अंगण तब्बल पाच वर्षांसाठी आपण कोणाला तरी आंदण देणार आहोत, आपल्या पुढच्या पिढीचे भविष्य देखील ठरवणार आहोत, हा विषय चेष्टेचा नाही.. गंभीर व्हा कर्तव्यनिष्ठ व्हा! सदसद विवेक बुद्धीने योग्य त्याच उमेदवाराला भरघोस मतदान करा समाजऋण काही प्रमाणात का होईना आपण फेडू!! आपल्या अहमदनगर शहराची सगळीकडे कुचेष्टा केली जाते, चांगल्या बाबतीत तर नाही परंतु सगळ्या वाईट बाबतीत अहमदनगर शहर सगळीकडे प्रसिद्ध आहे.. जे अघटीत कुठेच घडत नाही ते अहमदनगर शहरांमध्ये घडते.

अर्थात ही कुचेष्टा शहराची नसून तुमच्या आमच्या उदासीनतेची आणि निष्क्रियतेची आहे. मला एकट्याला काय घेणं आहे? माझं सगळं व्यवस्थित चाललेलं आहे..? हीच आत्मकेंद्रीत प्रवृत्ती अधोगतीला कारणीभूत ठरत आहे... आपली स्वप्न तर मोठी आहेत.. आपल्या अपेक्षा पण मोठ्या आहेत. परंतु त्या अपेक्षेसाठी आपली जी कर्तव्यं आहेत त्याबाबत आपण मुर्दाड झालेलो आहोत.

याबाबत एक शायर म्हणतो

ना फिक्र है कोई.. ना कोई आरजू है.. ना ख्वाब है कोई... ना कोई जुत्सजू है..

यह शख्स तो कब का मर चुका है ... तो फिर ये बेकफन सी लाश क्यू है..?

आपल्याला कोणी जिवंत लाश म्हणू नये आपण चांगले जिवंत आहोत हे सगळ्यांनी न चुकता मतदान करून दाखवून द्यावे.. आणि मुख्य म्हणजे आपल्या कर्तव्याप्रति इतके जागरूक व्हा.. की लोकप्रतिनिधींची तुम्हाला दहशत न वाटता लोकप्रतिनिधींना तुमची दहशत वाटली पाहिजे.. याविषयी अधिक ऊहापोह उद्याच्या अंकात करूया..

– सुहास मुळे, अध्यक्ष जागरूक नागरिक मंच,
मोबाईल ९००२६६८५५५

# विधानसभा निवडणुकीत दहशत, गुंडगिरी होण्याची शक्यता; गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या कार्यकर्त्यांना जिल्ह्यातून हद्दपार करा

## सचिन डफळ यांची मागणी

नगर – अहिल्यानगर २२५ विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार, दहशत, दबाव तंत्राचा वापर होणार असण्याची शक्यता आहे. शहरात असलेली गुंडगिरी, दहशतगिरी, अवैध व्यावसायिक शहराचे लोकप्रतिनिधी यांचे कार्यकर्ते असून त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीचे, दहशतीचे, मारामारी, धमकावणे, जागा ताबेमारी, खुनाचा प्रयत्न करणे, खून करणे व विविध अवैध व्यवसाय (जुगार, मटका, गुटका, सारेट, जबरी चोरी क्रिकेट सट्टा, आयपीएल) अशाप्रकारे गुन्हे दाखल असून त्यातील काही जणांनी तडीपारीची शिक्षा भोगलेली आहे.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात दहशत पसरू नये यासाठी उमेदवार सचिन डफळ यांनी पोलिस अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

आज हे सर्वजण शहराच्या आमदारांबरोबर प्रचारात व निवडणुकीचे काम करीत असून सर्वसामान्य लोकांमध्ये व व्यापारांमध्ये मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण झालेली आहे. या सर्व गुन्हेगारांना राजाश्रय असल्यामुळे या शेवटच्या टप्प्यामध्ये मोठ्या घटना घडण्याची शक्यता असल्याने मोठ्या प्रमाणात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांवर पण दबाव तसेच दहशतीचा वापर होऊ शकतो. एखाद्या, कार्यकर्त्यांनी मोबाईलवर स्टेटस ठेवले तर लगेच त्याच्यावर दबाव येतो सदर गुन्हेगार हेच उजळ माथ्याने प्रचारात फिरत असून त्यामुळे मतदारांवर मोठ्या प्रमाणात दहशत व दबाव आहे. त्याचा परिणाम मतदान न होण्यावर देखील होणार आहे, अशा गुन्हेगारांना ताबडतोब जिल्ह्यातून निवडणूक संपेपर्यंत हद्दपार करावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार सचिन डफळ यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# रेल्वेत प्रवाशांकडून पैसे घेताना तोतया 'टीसी' पकडला

## पुणे ते गोरखपूर रेल्वे गाडीतील प्रकार, नगरमध्ये गुन्हा दाखल

नगर – पुणे ते गोरखपूर या स्पेशल रेल्वेमध्ये तोतया टी. सी. (तिकीट निरीक्षक) आढळून आला आहे. त्याने तिकीट न घेणार्या रेल्वेमधील अनेक प्रवाशांकडून पैसेही घेतले असल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी दौंड रेल्वे स्टेशन येथील मुख्य तिकीट निरीक्षक शशीकांत मारूती धामणे (वय ५६, रा. साईदत्त निवास, पंचशील रस्ता, दौंड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर लोहमार्ग पोलीस ठाण्यात तोतया टी. सी. विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन संजय दिवेकर (वय २५, रा. प्राथमिक शाळे जवळ, कडेठाणवाडी, ता. दौंड, जि. पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. फिर्यादी धामणे यांची गुरूवारी (दि.१४) पुणे ते गोरखपूर या स्पेशल रेल्वेमध्ये दौंड ते नगर अशी चेकींग ड्यूटी होती. सदरची गाडी विसापूर रेल्वे स्टेशन येथे येऊन थांबली असता काही प्रवाशांनी धामणे यांना येऊन सांगितले की, एक टी. सी. डब्यात असून तो गाडी चेक करत आहे. तिकीट नसलेल्या प्रवाशांकडे ५००, एक हजार रुपयांची मागणी करत आहे. धामणे यांनी त्या तोतयाकडे ओळखपत्र मागितले असता त्याच्याकडे ओळखपत्र नव्हते.

तो तोतया टी. सी. असल्याची खात्री झाल्याने धामणे यांनी वरिष्ठांना याबाबत माहिती दिली. नगर रेल्वे स्टेशन येथे सकाळी ११ वाजता गाडी आल्यानंतर टी.टी.ई पांडुरंग आव्हाड, आर. पी.एफ. उपनिरीक्षक विकेश तिमांडे, आरपीएफचे हे. कॉ. जे. एस. नागुडे, आरक्षक सोमनाथ पठाडे, विठ्ठल खंडागळे आदी हजर होते. त्यांच्या समक्ष रेल्वेमधील प्रवाशांनी आमच्याकडून सचिन दिवेकर याने ५००, एक हजार रुपये घेतल्याचे सांगितले. सचिन दिवेकर याला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेत त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणीवर बलत्काराच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

नगर – २०/५/२०२३ रोजी आरोपी अतिक फिरोज पठाण, वय २३ वर्षे याने पिडीतेला देवदर्शनासाठी जाऊन येऊ म्हणून तिला परगांवी नेऊन तिस माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे असे म्हणून आत्महत्या करेन, अशी धमकी देऊन बळजबरीने शारिरीक सबंध केला. तसेच त्यानंतरही व्हॉटस्‌ॲपवर मेसेज पाठवून मी तुला बळजबरीने त्रास देईन व तुझ्या घरीपण येईन अशी धमकी दिल्याने तरुणीच्या फिर्यादीवरुन राहुरी पोलिसांनी आरोपीविरुध्द भा.दं.वि. कलम ३७६, ३५४ (अ), ३५४ (क), ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला. त्याची सुनावणी नुकतीच जिल्हा न्यायालयात होऊन त्यामध्ये आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपीतर्फे ॲड. सतिशचंद्र वि. सुद्रीक यांनी काम पाहिले.

## प्रमोद वागस्कर यांचे हृदयविकाराने निधन

नगर – केकती (ता.नगर) येथील रहिवासी प्रमोद गोकुळदास वागस्कर (वय ४०) यांचे १५ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर केकती येथील अमरधामम ध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, २ भाऊ, भाऊजया, चुलता, चुलती, चुलत भाऊ असा परिवार आहे. दिपक, राहुल वागस्कर यांचे ते बंधू तर मच्छिंद्र वागस्कर यांचे पुतणे होत.



## रामदास तापोळे यांचे वृद्धाकाळाने निधन

श्रीरामपूर – येथील वाहनचालक रामदास संपत तापोळे (वय ८६) यांचे वृद्धाकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन मुले, तीन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. काशिनाथ तापोळे व गोविंद तापोळे यांचे थोरले बंधू, वाहनचालक नंदकिशोर व अशोक तापोळे यांचे वडील, वृत्तपत्र विक्रेते दत्तात्रय तापोळे, संजय, रोहित व सनी तापोळे यांचे चुलते होत



# 'मिशन –७५ उपक्रमां'तर्गत सर्वाधिक मतदानासाठी लोकशाहीचे शिल्पकार पुरस्कार




नगर – भारताने नुकताच स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याचा अमृत महोत्सव साजरा केला.आपल्या अहिल्यानगर जिल्ह्याचा व भारतीय स्वातंत्र्याचा अत्यंत महत्त्वाचा संबंध आहे. हे औचित्य साधून श्री सिद्धाराम सालीमठ (जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी –अहिल्यानगर) यांच्या मिशन ७५ या संकल्पनेतून २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान करणाऱ्या गाव, शहर, उद्योग, कंपन्या, महाविद्यालयाचे युवा मतदार तसेच हाउसिंग सोसायटी यांच्यासाठी लोकशाहीचे शिल्पकार पुरस्कार जिल्हाधिकारी कार्यालयाचे वतीने प्रदान केले जाणार आहेत.

७५% पेक्षा अधिक मतदान करणाऱ्या गावांचा लोकशाहीचे शिल्पकार हा मानाचा पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे. उद्योजकीय क्षेत्रामधील कंपन्यांच्या मतदानासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांना सुपर वोटर अवॉर्ड दिला जाणार आहे. युवा नवमतदारांच्या मतदानासाठी महाविद्यालयांना युवाभारती पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.हाऊसिंग सोसायटयांना मतदानासाठी लोकशाहीचे शिल्पकार हा मानाचा सन्मान प्रदान केला जाणार आहे.

अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या माध्यमातून विविध नाविन्यपूर्ण मतदार जनजागृती चे उपक्रम जिल्ह्यामध्ये चालू आहेत.भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, सावलीसाठी मंडप व्यवस्था,वृद्धांना मदतीसाठी स्वयंसेवक,मतदार मदत कक्ष, दिव्यांगांसाठी रॅम्प, शौचालय आवश्यक तेथे आदी सेवा पुरवण्याचे नियोजन आहे.यातून सकारात्मकता वाढीस लागून मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढणार आहे. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र यांच्या वतीनेउत्सव निवडणुकीचा अभिमान महाराष्ट्राचा या निवडणुकांच्या उत्सवात प्रत्येकाने हिरीरीने सहभागी व्हावे व स्वतः ला व समाजाला अभिमान वाटेल असे मतदान करून जिल्हा राज्यात. देशात अग्रेसर बनवायचा आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सालीमठ यांनी केले.

सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून विविध उद्योजकीय कंपन्या, महाविद्यालये, तसेच हाउसिंग सोसायटी यांचे प्रतिनिधींनी आपापल्या आस्थापनातील एकूण मतदार व २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान केलेले मतदार व ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालेले आहे,असा अहवाल जिल्हा निवडणूक शाखा, पाचवा मजला, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर रोड, अहमदनगर येथे २५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सादर करावा.

तरी जास्तीत जास्त गावे, शहर, आस्थापने, कंपन्या, महाविद्यालये तसेच विविध संस्था,कामगार संघटना यांनी मतदानामध्ये शंभर टक्के सक्रिय सहभाग घेऊन मिशन–७५ ही लोकशाहीच्या ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची संकल्पना यशस्वी करावी असे आवाहन राहुल पाटील (उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी), अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), बाळासाहेब बुगे (शिक्षणाधिकारी–योजना),मीना शिवगुंडे (उपशिक्षणाधिकारी),आकाश दरेकर (उपशिक्षणाधिकारी), जयश्री कारले (विस्तार अधिकारी), डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदार दूत) प्रशांत गोसावी (निवडणूक नायब तहसीलदार) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींनी केले आहे.

# मतदान प्रक्रिया सुलभ आणि आनंददायी करण्याचे प्रयत्न व्हावेत



सिद्धाराम सालीमठ

नगर – मतदान केंद्रावर गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि दिव्यांग मतदारांना रांगेत उभे राहावे लागू नये याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर (दूरदृष्य प्रणालीद्वारे), महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, अपर जिल्हाधिकारी प्रविण महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील आणि दूरदृष्य प्रणालीद्वारे सर्व निवडणूक निर्णय अधिकारी तसेच समन्वयक अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, मतदान केंद्रांवर मतदारांना आनंदी आणि चांगले वातावरण मिळेल यादृष्टीने सुविधा करण्यात याव्यात. पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि मतदारांसाठी लागणाऱ्या अन्य सुविधा असतील याची मतदान केंद्रांना भेट देऊन खात्री करावी. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सायंकाळी मतदान केंद्रांना भेट देऊन प्रकाश व्यवस्थेचा आढावा घ्यावा. थंडीच्या पार्श्वभूमीवर मतदान कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा द्या.

बैठकीत मतदान केंद्रावरील किमान सुविधा, मतमोजणीसाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक, मतमोजणी केंद्रावरील व्यवस्था, मतदार माहिती चिठ्ठी वाटप, मतदार गृहभेटी, मतदान केंद्रावरील साहित्य, गृह मतदान, टपाली मतदान, वेबकास्टींग, दिव्यांग मतदारांसाठी सुविधा आदी विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. पन्नास कमी मतदान असलेल्या भागात गृहभेटीद्वारे मतदारांना मतदानाचे आवाहन करावे. मतदासंघातील ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात यावी. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअरची उपलब्धता तपासून घ्यावी. मतदार माहिती चिठ्ठी वितरणाचे काम लवकर पूर्ण करावे. यावेळी ईव्हीएम व्यवस्थापन, भरारी पथकाची जबाबदारी, मतदान साहित्य, मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेबाबत समन्वयक अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या.

# गृहिणी

## आरोग्य

### केस मुलायम होण्यासाठी

१ लिटर पाण्यात लिंबाची साले विरघळेपर्यंत उकळावीत नंतर हे पाणी स्वच्छ वस्त्राने गाळावे.

तेल लावल्यानंतर केसांना हे पाणी लावले तर केसांना चमक येते आणि मुलायमपणाही येतो.

## पाककला

### मँगो चॉकलेट

**साहित्य** – आंबा रस ताजा चार कप, दूध पावडर दोन कप, साखर तीन कप, ग्लुकोज पूड एक कप, पाव कप शुध्द तूप.

**साहित्य** – आंब्याच्या रसात साखर घालून ती पूर्ण विरघळून घ्या. नंतर दूध पावडर व ग्लुकोज पूड एकत्र करुन चांगली मिसळून आंबा मिश्रणात टाकून भांडे मंदाग्नीवर ठेवा. ढवळत राहा. मिश्रणाचा घट्ट गोळा होईपर्यंत थांबा. थाळीला तुपाचा हलकासा हात लावून हे घट्ट झालेले आंबा मिश्रण त्यात ओता. पसरुन थापा. थंड झाल्यावर त्याच्या वड्या पाडा.

## सौंदर्य

### त्वचा उजळण्यासाठी

टोमॅटो आणि लिंबाचा रस तसेच दूध सममात्रेत एकत्र मिसळून त्वचेवर लावावे. यानंतर १५ मिनिटांनी स्नान करावे. याने त्वचेचे सौंदर्य वाढते.

## सल्ला

साबण जास्त वाया जाऊ नये यासाठी फॉइल पेपर साबणाच्या खालच्या भागाला चिकटवा. साबण जास्त वाया जाणार नाही.

## वास्तू

* कार्यालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा कक्ष हा सर्वात प्रथम वा सुरुवातीला असू नये, प्रवेशद्वाराजवळ एखाद्या अशा सहायकाचे टेबल असावे, जो व्हिजिटर्सना माहिती देऊ शकेल.
* घर वा दुकानामध्ये वास्तूदोष असून, लक्ष्मीची अवकृपा रहात असेल तर रोज स्नानानंतर लक्ष्मीची प्रतिमा वा नोटांसमोर कनकधारा स्तोस्त्राचा पाठ करावा. लाभ अवश्य होईल.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १६ नोव्हेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, कृत्तिका १९।२८ सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २७ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. शत्रू पराजित होईल. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहाणार नाही.

**वृषभ** : निर्णय घेण्यापूर्वी सारखा विचार केल्याने नुकसान होईल. रोख रकमेची मोठी देवघेव होईल.

**मिथुन** : प्रेमसंबंधांमध्ये आवश्यक प्रगती होईल. आपल्या धाडसात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : प्रसिद्धी वाढण्याची शक्यता आहे. आपले धाडस वाढेल. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. मागील उधारी वसुल होईल.

**सिंह** : कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देण्यामुळे नुकसान होईल.

**कन्या** : आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. धनाच्या रुपात यश मिळवाल. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवाल.

**तूळ** : अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील.

**वृश्चिक** : कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा पण घाई करू नका. वाहने व उपकरणे बिघडण्याच संभव आहे.

**धनु** : वेळ अनुकूल आहे. कामांमध्ये प्रगती होईल. आरोग्य उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील.

**मकर** : काही प्रेमपूर्ण अनुभव आज येऊ शकतात. एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे करण्यात बराच वेळ जाईल.

**कुंभ** : इतर लोकांना आपल्या स्वतःची गरज व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**मीन** : हुशारीने गुंतवलेले धन आपला फायदा करुन देईल.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

'बाबा! ऋणको म्हणजे काय?' 'जो पैसे देणे लागतो असा माणूस.'
'आणि धनको म्हणजे?' 'ज्याला पैसे मिळतील असं वाटतं तो माणूस.'

# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* खडा टाकणे या वाक्प्रचाराचा अर्थ काय? – अंदाज घेणे
* वनामती संस्था कोणत्या शहरात आहे? – नागपूर
* मधुहेह कोणता घटक कमी असल्याने होतो? – इन्शुलिन
* क्षणोक्षणी या सामासिक शब्दाचा विग्रह ओळखा? – प्रत्येक क्षणाला

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०५० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | |
| ९ | | | | | ■ | १० | |
| ११ | | ■ | | ■ | ■ | १२ | |
| ■ | ■ | १३ | ■ | १४ | | | |
| १५ | ■ | १६ | | | ■ | | ■ |
| १७ | १८ | | ■ | १९ | २० | ■ | २१ |
| २२ | | | ■ | २३ | | | |

**आडवे शब्द :-** १) कामबंद आंदोलन; हरताळ ३) डळमळीत; अस्थिर; दोलायमान ७) चालण्याची ढब; पद्धत ८) एका दिवसात आक्रमिलेला रस्ता; टप्पा ९) पुन्हा पुन्हा तीच चूक करणारा; निर्लज्ज १०) पाठीची मधली हाडांची मालिका; पाठीचा कणा ११) आवश्यकता; गरज; जरुरी १२) आई; जननी; माय १४) पाणी भरण्याची सार्वजनिक जागा १६) स्त्रिया वेणीत माळतात तो फुलांचा हार १७) गोष्ट; बाब; रक्कम; लेखणी १९) अनेक कुटुंबे रहात असलेले मोठे घर २२) स्त्रिया उद्यापन केल्यानंतर भटजीस देतात ते दान २३) जिव्हा; जीभ; रसना

**उभे शब्द :-** १) चालविणे २) पलीकडची 'बाजू; पैलतीर ३) कोलकात्याचे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पूर्वीचे नाव) ४) एका काटेरी वनस्पतीचे फळ व बी जो लहान मुली सागरगोटा म्हणून खेळतात ५) घाण; विष्ठा ६) तरुण व बळकट १०) कमाई करणारा; मिळविणारा १३) येणे १४) समुद्र; मर्यादा; अंत १५) भूल पाडणारे भूत १८) वाद्य वाजविल्यानंतर त्याचा काही काळ राहणारा आवाज २०) मच्छर; मशक २१) वेग; स्पीड

### शब्दगंध क्र. ७०४९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | त | न | ■ | उ | पा | स | ना |
| मा | ण | ■ | त | पो | व | न | ■ |
| व | म | ण | ■ | ष | ■ | ■ | टो |
| ■ | णी | ■ | ग | ण | ना | य | क |
| अ | ■ | चा | वा | ■ | न | ■ | ■ |
| व | र | प | क्ष | ■ | क | प | ट |
| घ | ण | ■ | ■ | का | टा | ■ | व |
| ड | ■ | ह | ल | वा | ई | ■ | का |

### फिल्मीचक्कर क्र. ११६३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मे | रे | जी | व | न | सा | थी | ■ |
| री | ■ | व | ■ | य | ■ | ■ | त |
| आ | ■ | न | वी | न | ■ | ब | डी |
| वा | ■ | ■ | र | ■ | | ■ | पा |
| ज | य | ■ | ता | क | त | व | र |
| सु | ■ | ब | ■ | या | ■ | ■ | ■ |
| नो | ■ | सं | ग | म | ■ | दे | ■ |
| ■ | प्री | ती | ■ | त | क | दी | र |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : अ‍ॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : खरोखर महान तोच की जो कोणावर वर्चस्व गाजवत नाही व त्याच्यावर कोणी वर्चस्व गाजवू शकत नाही.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## आम्लपित्त म्हणजे काय?

आम्लपित्त म्हणजे जठरात प्रमाणापेक्षा जास्त आम्ल तयार होणे. साधारणतः पचनसंस्थेत आम्लाची, अल्कलीची निर्मिती होत असते. आम्लाची निर्मिती झाल्यावर त्याच्या उदासिनीकरणासाठी त्याविरुद्ध अल्कलीचे प्रमाण वाढते. अल्कली निर्माण होण्यास गॅस्ट्रीन हे संप्रेरक कारणीभूत असते. अल्कलीचे प्रमाण वाढले की, व्हॅगस नावाच्या चेतातंतूद्वारे उद्दीपन होऊन आम्लाची निर्मिती होते व अल्कली उदासीन होतात. परंतु, बऱ्याचवेळा उदासिनीकरणानंतरही आम्लाची निर्मिती होत राहते व जादा आम्ल तयार होण्याने तक्रारी सुरू होतात. यालाच आम्लपित्त होणे असे म्हणतात. या जास्तीच्या आम्लामुळे पोटात/छातीत जळजळ, तोंडाला आंबट पाणी येणे व कधी कधी उलटी होणे, अशा तक्रारी सुरू होतात. आम्लपित्ताच्या तक्रारीचे पुढे अन्नमार्गात होणाऱ्या अल्सरमध्ये म्हणजे व्रणात रूपांतर होऊ शकते. आम्लपित्त या आजाराचे प्रमाण खेड्यांपेक्षा शहरी लोकांत जास्त आहे. कारण की curry-rry-worry-curry या गोष्टी शहरात राहणाऱ्या व्यक्तींच्या दैनंदिनीचा भाग झालेला असतो. Hurry म्हणजे घाई, धावपळ, बस लोकलच्या वेळा सांभाळणे, त्यासाठी घाईघाईने जेवणे, सर्व गोष्टी वेळांमध्ये बसवण्याची कसरत करत राहणे, जेवणाच्या वेळातील अनियमितता. worry म्हणजे व्यवसायानुरूप येणाऱ्या, सामाजिक कारणांमुळे निर्माण होणाऱ्या चिंता; तसेच curry म्हणजे मसालेदार पदार्थ! खूप तिखट, तेलकट आंबट पदार्थ वारंवार खाण्यामुळे; तसेच दारू, सिगारेट यांचे अतिसेवन यामुळे जठरातील आम्लनिर्मिती प्रमाणापेक्षा अधिक होऊन आम्लपित्ताच्या तक्रारी सुरू होतात. आम्लपित्ताचा त्रास कमी करावयाचा असेल, तर वरील सर्व गोष्टी टाळणे; दिनचर्या नियमित करणे; अनाठायी चिंता, विडी सिगारेट दारू तंबाखू यांचा अतिरेक न करणे; तिखट, मसालेदार पदार्थ कमी खाणे हे उपाय करायला हवेत. आम्लपित्तावर अँटासिडच्या गोळ्या वापरतात. घरगुती उपायांमध्ये सोडा, लिंबू घेऊन हा त्रास कमी करता येतो. जेवणाच्या वेळा नियमित ठेवणे, जागरण टाळणे, आहारात ज्वारीची भाकरी, मुगाचे वरण, हिरव्या पालेभाज्या, ताक यांचा समावेश करणे, व्यसन टाळणे या उपायांनी आम्लपित्तावर नक्कीच मात करता येईल. आयुर्वेदात यासाठी खूप चांगले उपचार उपलब्ध आहेत. अर्थात औषधीपेक्षा जीवनशैलीतील बदल उपचारात महत्त्वाची भूमिका बजावतात, हे विसरता कामा नये. आम्लपित्ताला व त्यामुळे होणाऱ्या व्रणांना हेलिकोबॅक्टर पायलोरी हे जिवाणू जबाबदार असतात. असे संशोधन करणाऱ्या डॉ. मार्शल व डॉ. वॉरेन या ऑस्ट्रेलियन संशोधकांना २००५ च्या वैद्यक शास्त्रातील नोबेल पुरस्कार देण्यात आला आहे. त्यामुळे आता या आजाराच्या उपचारात पुष्कळ बदल होणार आहेत!

## सुसरीची साखर-पेरणी

एका नदीत खूप सुसरी राहत होत्या. त्या नेहमी मेल्यासारख्या एका ठिकाणी पडून राहत, आणि कोणी प्राणी पाणी पिण्यास आला, की क्षणात झडप घालून त्याला जबड्यात पकडून ठार मारुन खाऊन टाकीत.

असेच एकदा एक सुसर मेल्याचे सोंग घेऊन पाण्याखाली स्वस्थ पडून होती. तेवढ्यात पाणी पिण्यासाठी एक कुत्रा तेथे आला. येथे थोडे, तिथे थोडे, अशा प्रकारे पाणी पीत तो आपली तहान भागवू लागला. हे सावज काही आपल्या तावडीत सापडत नाही, असे पाहून ती सुसर पाण्यावर डोके काढीत म्हणाली, ''अरे मित्रा, एका ठिकाणी उभा राहून पाणी पी. घाई करुन पाणी प्यालास, तर तुला ठसका लागून आजारी पडशील की. हे बघ, माझ्याजवळ चांगले निर्मळ पाणी आहे. ये येथे. आज किती दिवस झाले, मला तुझ्याशी मैत्री करावी वाटते. तुझा स्वभाव फार चांगला आहे, असेही मला कळले. ये असा जवळ, म्हणजे तुला कडकडून भेटता तरी येईल.''

सुसरीची ही साखर-पेरणी ऐकून कुत्रा लांबूनच म्हणाला, ''बाई तुला लांबूनच नमस्कार करतो. खरे म्हणशील, तर तुझ्यामुळेच मला असे ठिकठिकाणी थोडे थोडे पाणी प्यावे लागते. कधी झडप घालून तू माझा मुडदा पाडशील, याचा काय नेम? तुझी मैत्री तुलाच लखलाभ होवो.'' असे म्हणत कुत्रा तेथून धूम पळाला.

**तात्पर्य** : इतरांच्या गोड बोलण्याला भाळू नये. आधी त्यातील खरे खोटेपणा पहावा.

# जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



## जीवन की रोशनी

ब्रह्म विद्या को पूरी तरह समझना और फिर अभ्यास करके सफलता पूर्वक ब्रह्मांड एक सिरे से दूसरे सिरे तक, एक पड़ाव से दूसरे पड़ाव तक, स्थूल मादे के स्थूल संसार से महामाया के सबसे सूक्ष्म और सुन्दर स्थान 'ब्रह्म लोक' तक यात्रा करना एक बहुत ही लम्बी और थका देने वाली प्रक्रिया परमात्मा की शक्ति का प्रगटावा ब्रह्म है जो 'ओम्' में स्थित है। यह वैदिक साहित्य में सबसे पवित्र शब्द माना जाता है। यही अक्षर यूनानियों का लागोस और भिन्न-भिन्न धर्मों का 'एक ओंकार' है।

पुरातन ऋषियों की सबसे ऊँची शिक्षा जिसका उन्होंने घने जंगलों, बर्फीली पर्वतीय गुफाओं में अथाह अभ्यास समाधि में स्थित रहकर

अनुभव किया, वेदान्त उसे मनुष्य की सबसे बड़ी प्राप्ति कहता है। ब्रह्म, सृष्टि की आत्मा है, वह सृष्टि जिसमें ऊपर बताए तीनों लोक और इनके बीच सब कुछ आ जाता है। इस तीन रंगों वाली सृष्टि का स्वामी त्रिलोकीनाथ है। उपनिषदों को ही सही अर्थों में वेदांत कहा जाता है जो शुद्ध सुच्चे मोतियों की तरह सूत्र रूप में मिलते हैं और इन्हें वास्तव में ही वेदान्त अर्थात् वेदों की सीढ़ी (शिक्षा) के आखिरी डंडे या हिस्से कहा जाता है क्योंकि यह सार रूप दैवी ज्ञान से ओत-प्रोत हैं। हर उपनिषद 'सोह के महाकाव्य से समाप्त होता है जिसका अर्थ है कि मनुष्य अपने शुद्ध आत्म रूप में ब्रह्म ही है और जो कोई इसका अनुभव प्राप्त कर लेता है अहं ब्रह्म असमी या मैं ब्रह्म हूँ या मैं और मेरा पिता एक हैं पुकार उठता है और कह देता है:-

मैं अपनी ओर से कुछ नहीं कहता, परन्तु वह कहता हूँ जो मेरा पिता मुझसे कहलवाता है।

वेदान्तों की सबसे महान् शिक्षा यही है कि हम सब अपने आदि में, अपनी अन्तरी और बाहरी बनावट में और अपनी शक्तियों और समर्था में चाहे ये कितनी गुप्त अवस्थाओं में हों, एक हैं और इनको विकसित करने योग्य हैं। 'निज' के प्रकाशित होने की प्रक्रिया सभी के लिए एक जैसी ही है और फिर हमारा लक्ष्य भी एक ही है क्योंकि हम सारे ब्रह्म के ही पुजारी हैं। इस तरह सांस द्वारा बाहर निकाला हुआ, व्यक्तित्व मन (जीवन) सांस द्वारा अन्दर खींचे हुए ब्रह्मण्डी मन 'अहत्व' में समा जाता है। इसी ब्रह्म को ही ढ्हळीव ऊेंसी या दैवी रचनात्मक बुद्धि, हिन्दुओं का ब्रह्म, बौद्धों की 'मंड जुसरी' ईसाइयों की 'पवित्र रूह' और सूफी फकीरों का 'अल्लाह हू' कहा जाता है।

यहाँ ब्रह्म लोक में आत्माएँ ब्रह्म के निकटतम प्यार, बुद्धि और आनन्द बहुत समय लीन रहती हैं और यह निवास काल वास्तव में इतना लम्बा होता

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

## अंतरीक बल

आज वही टीचर एडिसन के नाम के साथ जुड़ी है परंतु एक कलंक के तौर पर। अगर उस टीचर ने एडिसन को पहचाना होता तो आज उसका नाम एडिसन के साथ गौरव से जुड़ा होता । एडिसन की मां ने उसे पहचाना इस लिये उस का नाम बड़े शान से लिया जाता है। समस्यायें व्यक्ति की क्षमता को तराशती हैं, मांजती हैं। जो पेड़ पौधे मौसम अनुसार अपने को ढाल लेते हैं वह बच जाते हैं नहीं तो नष्ट हो जाते हैं। जो लोग मकान नहीं खरीद सके जब जमीन १० रुपए गज थी वह आज पच्छाताप कर रहे हैं। मदर तेरेसा ने अवसर पहचाना और नौकरी छोड़ दी। जिन बहिनों ने अवसर को पहचाना ब्रह्म बाबा का साथ दिया। आज वही बहिनें विश्व द्वारा पूजी जा रही हैं। धीरू भाई अम्बानी ने अवसर को पहचाना आज अरबो रुपए का सम्राज्य उसके बच्चों के पास है। जो विद्यार्थी जीवन को अवसर समझते हैं वही आफिसर बनते हैं। जो भाई बहिने संगम युग को अवसर समझ कर पुरुषार्थ कर रहे हैं वही कल्प कल्प राजा बनेगें। आदते और समय प्रबन्धन

हम जो कुछ भी सोचते हैं, जो कुछ भी बोलते हैं और जो कुछ भी करते हैं, उसकी प्रतिक्रिया हमारे मुख पर अंकित हो जाती है। शब्दो में असीम शक्ति होती है। धरती और आकाश मिट सकते उच्चारित शब्द कभी नहीं मिटते। अच्छे शब्दो से दूसरों का उत्साह जाग जाता है। मुख से निकला प्रत्येक शब्द एक संदेशवाहक है। प्रेम के शब्द प्रेम का संदेश देते हैं। बुरे शब्द बैर विरोध का संदेश देते हैं। सुनने से बहुत असर होता है। लिखित शब्द भूल जाते हैं। सुने गये शब्द आसानी से नहीं भूलते। मैं इसे अवश्य करूंगा। इन शब्दो को उंचारित करते रहो। आप जो चाहते हैं उसे पा लेंगे।

समस्याओ से हार मत मानें। कभी अपने को भाग्यहीन मत मानो। कमजोरी की बातें सोचते रहोगे तो यह आदत बन जाएगी। इस समय संसार दुखी इसलिए है क्योंकि ज्यादातर लोग कमजोरी की बातें ही सोचते रहते हैं। यदि आप बाधाओं पर बिजय पाना चाहते हैं तो स्वयं के प्रति दिल में दोहराते रहो, मैं जो हूं उस से अधिक करूंगा। मैं सदा परोपकार की भावना से ही कार्य करूंगा। शुरू में आप को लगेगा यह मूर्खता है। परंतु इस अभ्यास को नहीं छोड़ना। धीरे धीरे आप को लाभ होता हुआ दिखेगा।

अधिकतर कठिनाइयां मानसिक ही होती हैं। अपने मन में ऐसे भी आप जैसा बनना है। धीरे धीरे आप उस जैसा बनते जाएंगे। पुरानी व्यक्ति का चित्र देखें जिस से आप प्रभावित हैं। मन में कहते रहें मुझे गवाओ। जो संकल्प किया है उसे दोहराते रहें। वही आदत बन आदत के कारण गलती होने पर व्यर्थ में सोच सोच कर समय मत जाएगा। किसी की निन्दा या प्रशंसा की प्रवाह न करें। समय उत्पन्न करें

हम समय को वस्तु की तरह नहीं बचा सकते। हर सप्ताह में १६८ घंटे होते हैं और आप उन्हें दुबारा नहीं पा सकते। लोग दिन भर फालतू में घूमते रहते हैं। हम सुबह या शाम को घूम सकते हैं। पर घूमने की जरुरत हमें दिन में तो नहीं है। दुनिया भर में लोग यू ट्यूब के दीवाने हैं, अगर हम यू ट्यूब का इस्तेमाल कुछ सीखने के लिए कर रहे हैं तो यह ठीक है। अगर हम फालतू की चीजे देखते हैं तो यह समय की बर्बादी है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## संपूर्ण गर्भावस्थेमध्ये घ्यावयाची काळजी

१) गर्भावस्थेतील संपूर्ण नऊ महिने भावी मातेच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे असतात. आपले बाळ मुलगा आहे की मुलगी याची काळजी मातेने करू नये. घरातील इतर सदस्यांनीही करायला लावू नये; यामुळे माता नकारात्मक विचारांमध्ये राहते. याचा गर्भावर वाईट परिणाम होऊ शकतो.

२) गर्भवतीने दुसऱ्यांबद्दल असूया, सूडभावना, मनामध्ये वाईट विचार आणू नये. खोटे, असत्य बोलू नये. नेहमी सत्य, खरे बोलावे. नेहमी प्रसन्न, हसतमुख, सकारात्मक विचारसरणीच्या लोकांमध्ये मिसळावे; त्यामुळे आपले विचार देखील सकारात्मक राहतात.

३) सकाळी व संध्याकाळी शुद्ध मोकळ्या हवेत किंवा बागेमध्ये फेरफटका मारायला जावे.

४) प्राणायाम, ध्यान-धारणा, ॐकार करावेत; यामुळे फुप्फुसांची कार्यक्षमता वाढते. शारीरिक व मानसिक संतुलन व्यवस्थित राहते. शक्यतो शीतपेये (कोल्ड्रींक्स) टाळावीत. यांच्यापासून गर्भाला त्रास उद्‌भवू शकतो. या ऐवजी आवळा सरबत, लिंबूसरबत, कैरीचे पन्हे, नारळाचे पाणी ही पेये घ्यावीत.

५) स्तनाग्रांना तेल अथवा तूप लावावे व अंघोळीच्या वेळेला पुढे ओढावित; यामुळे प्रसूतीनंतर बाळाला दूध पिण्यास अवघड जात नाही.

६) खूप गरम किंवा गार पाण्याने अंघोळ करू नये. शरीराला सुसह्य होईल असेच पाणी वापरावे. उन्हाळ्यात देखील गार पाण्याने अंघोळ करू नये. तसेच सोनाबाथ, स्टीमबाथ यांचा वापर करू नये, कारण उच्च तापमानामुळे गर्भाला धोका पोहचू शकतो व गर्भवतीला देखील चक्कर येऊ शकते.

७) गर्भावस्थेत डॉक्टरांच्या सल्ल्याने तीन ते चार वेळेला सोनोग्राफी करून घ्यावी.

८) गर्भावस्थेत डॉक्टरांच्या सल्ल्याने काही योगासने करावीत. ९) गर्भवतीने गर्भपात होऊ नये म्हणून जड काम किंवा एकाच हातात जास्त वजनाचे सामान घेणे टाळावे. तसेच प्रवास देखील टाळावा. टू-व्हीलर चालवणे, रिक्षातून प्रवास करणे टाळावे. तसेच कारमधून प्रवास करताना सीटबेल्ट घट्ट व व्यवस्थित लावावा.

१०) थंडी, ताप, सरदी, खोकला, जुलाब असे आजार झाल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घ्यावीत.

११) बाहेरचे पाणी, पदार्थ टाळावेत. घरातून बाहेर पडताना स्वतःचा डबा व उकळलेले पाणी बाटलीत घेऊन जावे. तसेच स्वयंपाक करताना स्वतःचे हात तसेच भाज्या स्वच्छ करुन घ्याव्यात. स्वयंपाक करताना स्वच्छतेची सर्वतोपरी काळजी घ्यावी.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जिल्ह्यात गृह मतदानास सुरूवात

## ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदारांचा समावेश



नगर - अहमदनगर शहर मतदारसंघ वगळता जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात आजपासून गृह मतदानास (होम वोटिंग) सुरूवात झाली. ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांसाठी निवडणूक आयोगाने ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा व मतदानापासून कोणीही मतदार वंचित राहू नये, यासाठी लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात १४ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत गृह मतदान होणार आहे. आज मतदानाच्या पहिल्या दिवशी अकोले विधानसभा मतदारसंघात २५५ पैकी १३३ ज्येष्ठ नागरिक, १६ दिव्यांग असे एकूण १४९ मतदारांनी गृहमतदान केले. संगमनेर मतदारसंघात २५२ पैकी ९८ ज्येष्ठ नागरिक, २४ दिव्यांग असे एकूण १२२, शिर्डी मतदारसंघात १९८ पैकी ८५ ज्येष्ठ नागरिक, १३ दिव्यांग असे एकूण ९८, कोपरगाव मतदारसंघात २१८ पैकी ७७ ज्येष्ठ नागरिक, २२ दिव्यांग असे एकूण ९९, श्रीरामपूर मतदारसंघात ७० पैकी ५९ ज्येष्ठ नागरिक, ८ दिव्यांग असे एकूण ६७, नेवासा मतदारसंघात १९४ पैकी १३६ ज्येष्ठ नागरिक, २१ दिव्यांग असे एकूण १५७, राहूरी मतदारसंघात १४४ पैकी ६३ ज्येष्ठ नागरिक, १२ दिव्यांग असे एकूण ७५, पारनेर मतदारसंघात २३८ पैकी ८२ ज्येष्ठ नागरिक, ९ दिव्यांग असे एकूण ९१, कर्जत - जामखेड मतदारसंघात ३१० पैकी १३३ ज्येष्ठ नागरिक, १५ दिव्यांग असे एकूण १४८ मतदारांनी गृह मतदान केले.

मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व सूक्ष्म निरीक्षक यांचा समावेश असलेल्या पथकांच्या माध्यमातून गृह मतदान मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धाराम सालीमठ, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, बाळासाहेब कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी गृह मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहेत.





सारसनगर भागातील महात्मा फुले चौक येथे चौक सभेत बोलताना महाविकास आघाडीचे विधानसभा उमेदवार अभिषेक कळमकर. समवेत विक्रम राठोड, संभाजी कदम, भगवान फुलसौंदर, किरण काळे, बाळासाहेब बोराटे, योगिराज गाडे, सुनील त्रिपाठी, दिलीप सातपुते, निलेश मालपाणी.

# निवडून आल्यानंतर दीड वर्षांत शहरात विकास दाखवून देऊ

## सारसनगर महात्मा फुले चौक येथे अभिषेक कळमकर यांची चौक सभा

नगर- महाविकास आघाडीचे विधानसभा उमेदवार अभिषेक कळमकर यांच्या प्रचारासाठी सारसनगर भागातील महात्मा फुले चौक येथे चौक सभा आयोजित करण्यात आली. या सभेला महाविकास आघाडीचे प्रमुख नेते विक्रम राठोड, संभाजी कदम, भगवान फुलसौंदर, किरण काळे, बाळासाहेब बोराटे, योगिराज गाडे, सुनील त्रिपाठी, दिलीप सातपुते, निलेश मालपाणी आणि नगर शहरातील नागरिक उपस्थित होते.

अभिषेक कळमकर यांनी म्हटले, आता वेळ आली आहे नगर शहराच्या विकासाची. मी निवडून आल्यानंतर केवळ वचनांची नाही तर प्रत्यक्ष कामांची गॅलरी तुम्हाला दाखवून देऊ. दीड वर्षांच्या आत विकास काय असतो हे प्रत्यक्ष अनुभवणार. कळमकर यांनी नागरिकांना आश्वस्त केले की, त्यांच्या नेतृत्वाखाली नगर शहराचा सर्वांगीण विकास होईल, आणि शहरातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षितता, रोजगार आणि उत्तम जीवनमान मिळवून देण्यासाठी ते कटिबद्ध आहेत.

सभेत प्रमुख वक्त्यांनी कळमकर यांच्या उमेदवारीला पूर्णपणे पाठिंबा दिला. विक्रम राठोड यांनी आपल्या भाषणात शहरातील वाढत चाललेली गुंडगिरी आणि अराजकतेच्या बाबतीत चिंता व्यक्त केली. नगर शहरातील गुंडगिरी संपवायची असेल, तर एकच मार्ग आहे - अभिषेक कळमकर यांना निवडून द्या. तेच योग्य नेतृत्व देऊ शकतात आणि नगरला एक सुरक्षित, शांत आणि सुव्यवस्थित शहर बनवू शकतात.

संभाजी कदम यांनी देखील आपल्या भाषणात महाविकास आघाडीचे नेतृत्व आणि कळमकर यांच्या कामाची प्रशंसा केली. ते म्हणाले, नगर शहरात परिवर्तन होणार हे नक्की आहे. कळमकर यांच्या नेतृत्वात नगरचे भविष्य उज्ज्वल होईल. लोकांची मानसिकता बदलली आहे, आणि यावेळी नगरच्या विकासाची खरी गरज आहे.

भगवान फुलसौंदर आणि किरण काळे यांनी नगर शहराच्या विविध मुद्यांवर लक्ष केंद्रित करत, कळमकर यांच्या विकासाच्या वचनाची चर्चा केली.

बाळासाहेब बोराटे आणि योगिराज गाडे यांनी महाविकास आघाडीच्या एकतेचे महत्त्व सांगितले.

सुनील त्रिपाठी आणि दिलीप सातपुते यांनी नगरमध्ये समाजातील विविध घटकांसाठी कळमकर यांच्या नेतृत्वाखाली कशा प्रकारे समृद्धी मिळू शकेल याबाबत चर्चा केली. नागरिकांनी कळमकर यांच्या उमेदवारीला संजीवनी देत, महाविकास आघाडीच्या विजयाची खात्री व्यक्त केली.

कळमकर यांनी असेही स्पष्ट केले की, नगरला आदर्श शहर बनवण्यासाठी आपल्याला एकजूट व्हायला हवं, आणि माझ्या नेतृत्वाखाली नगरला एक अशी दिशा देणार, जिथे सर्वांचे कल्याण होईल. विकासाच्या ध्येयाने नागरिक एकत्र आले आहेत आणि याही वेळी कळमकर यांच्या विजयी होण्याचे दृढ विश्वास व्यक्त करण्यात आला.

# गुरुनानक देवजी जयंती निमित्त शहरातून प्रभात फेरी

## गुरुनानकांच्या जयघोषाने दुमदुमले परिसर, आहुजा परिवाराच्या वतीने प्रभात फेरीतील भाविकांचे स्वागत




गुरुनानक देवजी जयंती निमित्त शहरातून काढण्यात आलेली प्रभात फेरी.

नगर - बोले सो निहाल, सत श्री अकाल... चा जयघोष, अखंडपाठ, किर्तन व प्रवचनांच्या भक्तीमय वातावरणात शहरातील विविध गुरुद्वारा येथे गुरुनानक देवजी यांची ५५५ वी जयंती म्हणजेच गुरुपुरब उत्साहात साजरा करण्यात आला. शुक्रवारी (दि.१५ नोव्हेंबर) सकाळी तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथून शीख, पंजाबी व सिंधी समाजाच्या वतीने पारंपारिक वाद्यासह प्रभातफेरी काढण्यात आली होती. यामध्ये समाजबांधव व महिलांनी सहभागी होऊन गुरुनानक देवजी यांचा जयघोष केला. तारकपूर परिसरातून निघालेल्या या प्रभातफेरीचे टॉपअप पेट्रोल पंम्प येथे जनक आहुजा परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. फेरीमध्ये वाहनावर असलेल्या गुरुग्रंथ साहिबावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तर गुरुनानक देवजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांनी सामुदायिक अरदास (प्रार्थना) करुन सुख, समृध्दी व शांततेसाठी प्रार्थना केली.

याप्रसंगी जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, रवी बक्षी, राजीव बिंद्रा, जतीन आहुजा, अभिमन्यू नय्यर, अनिश आहुजा, राजेंद्र कंत्रोड, बबलू आहुजा, ब्रिजमोहन कंत्रोड, निप्पू धुप्पड, सौरभ आहुजा, सतीश गंभीर, किशोर कंत्रोड, सागर कुमार, गुलशन कंत्रोड, कैलाश नवलानी, जय रंगलानी, भारत पेट्रोलियमचे टेरीटोरी कॉर्डिनेटर किर्ती कुमार, विक्की कंत्रोड, दिनेश कंत्रोड, पियुष कंत्रोड, गौरव कंत्रोड, दामोदर माखीजा, अवतार गुरली, मनमोहन चोपडा, रोहित बत्रा आदींसह समाजबांधव व महिला उपस्थित होत्या.

गुरुनानक जयंतीनिमित्त मागील सात दिवसापासून शहरातील व तारकपूर येथील गुरुद्वारा येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कीर्तन-प्रवचन, अखंडपाठ, सांस्कृतिक कार्यक्रमासह लंगरचा भाविकांनी लाभ घेतला. कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून गुरूनानक देवजी यांचे संदेश व विचार समाज बांधवांना सांगण्यात आले.




## शहरात आ. संग्राम जगतापांच्या विकास यात्रेला नगरकरांचा प्रतिसाद

महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ गुरुवारी (१४ नोव्हेंबर) शहरातील मंगलगेट, कोठला, सर्जेपूरा आदी परिसरातून नगर विकास यात्रा काढण्यात आली. यावेळी घराघरातून आ. जगताप यांचे स्वागत करण्यात आले. चौका-चौकात युवकांनी त्यांचा फुलांच्या वर्षावाने उत्स्फूर्तपणे स्वागत केले. या प्रचार रॅलीत युवा वर्ग सहभागी झाले होते.

# कल तारण गुरु नानक आयो : एकतेचा आणि मानवतेचा दिव्य संदेश

शीख समाजाचे संस्थापक, श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी तल्वंदी (सध्या पाकिस्तानमध्ये) इ.स. १४६९ मध्ये झाला. लहानपणापासूनच त्यांनी प्रादेशिक भाषा, पर्शियन आणि अरबीचे शिक्षण घेतले. इ.स. १४८७ मध्ये त्यांचा विवाह झाला आणि त्यांना दोन मुले झाली.

त्यांच्या मेहुण्याच्या आग्रहावरून त्यांनी सुलतानपूर येथे दौलत खान लोधी यांच्या दुकानात काम केले. एकदा दुकानात तेरा शब्द ऐकून त्यांनी सर्व ग्राहकांना सर्व वस्तू मोफत दिल्या. याच घटनेमुळे तेरा (१३) हा आकडा शीख समाजात शुभ मानला जातो.

गुरु नानकजींच्या वडिलांनी त्यांना व्यवसाय करण्यासाठी वीस रुपये दिले होते. परंतु, त्यांनी त्या पैशांनी गरीबांना अन्न खरेदी करून वाटप केले, ज्याला सचा सौदा म्हटले जाते. आज या ठिकाणी सचा सौदा गुरुद्वारा आहे.

इ.स. १४९६ मध्ये त्यांना साक्षात्कार झाला, आणि त्यांच्या पहिल्या संदेशात त्यांनी ना हिंदू आहे, ना मुसलमान असे म्हणत एकतेचा संदेश दिला. त्यांनी पाच प्रमुख यात्रा केल्या, ज्या दरम्यान त्यांनी विविध धर्मांचे सखोल ज्ञान घेतले आणि एक करतार (एक ईश्वर) हा संदेश दिला.



एका प्रसंगात त्यांनी श्रीमंत मलिक भागो यांच्या आमंत्रणास नाकारून गरीब कारागीर भाई लालो यांच्या घरी वास्तव्य केले. यावेळेस श्री गुरू नानक देवजी यांनी भागोच्या घरचा खरखरीत वडी अन्न आणि लालो च्या झोपडी मधील चपाती हातात दाबली. लालो यांच्या कडक घामाच्या वडीतून दूध आणि भागो च्या अनापासून रक्त निघाले.त्यांनी गरीब आणि कष्टकरी लोकांसाठी प्रामाणिक जीवन जगण्याचा संदेश दिला.

हरिद्वार येथे त्यांनी सूर्यासमोर गंगा पाणी अर्पण करणाऱ्या लोकांना आपल्या कृतीतून उपदेश दिला. त्यांनी पश्चिमेकडे पंजाबातील शेतासाठी पाणी अर्पण करण्याची कृती केली आणि समज दिली की स्वर्गातील पूर्वजांपेक्षा शेत अधिक जवळ आहे.

गुरू नानक देवजींनी करतारपूर येथे स्थायिक होऊन शेती आणि देवाची पूजा सुरू ठेवली. त्यांनी धर्मप्रचार करत जपजी साहिब आणि सोदर यांच्या माध्यमातून मानवतेचा संदेश दिला. त्यांनी एक नवा पंथ स्थापन केला, ज्यामध्ये एकतेचा आणि प्रामाणिकतेचा आदर्श ठेवला. देशभरात त्याच्या अनुयायांना नानक-पंथी किंवा शीख म्हणून ओळखले जाऊ लागले. त्याचे अनुयायी सत् कर्तार (देव सत्य आहे) या शब्दांनी एकमेकांना अभिवादन करत होते. देशाच्या लांबी आणि रुंदी ओलांडून त्याच्या विस्तृत प्रास्तविक यात्रा आणि उपदेश त्यांनी २५ वर्ष केले.

गुरू नानक देवजींनी आपल्या उत्तराधिकारासाठी आपले पुत्र बाबा श्रीचंद आणि बाबा लखमीचंद यांना निवडले नाही. त्याऐवजी त्यांनी भाई लहेंगा यांना अंगद नाव देऊन औपचारिकरित्या आपल्या पंथाचे उत्तराधिकारी घोषित केले. या निर्णयातून, गुरू नानक देवजींनी शीख धर्माच्या स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण आध्यात्मिक प्रणालीची पायाभरणी केली, ज्यामध्ये कुटुंबाऐवजी योग्यतेला, सेवेला अधिक महत्त्व दिले.

गुरू नानक देवजींच्या ५५५ व्या जयंतीनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**- हरजीत सिंग वधवा - ९४२३१६२७२७**





गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त तारकपूरला रंगलेल्या किर्तन दरबारमध्ये सहभागी झालेले संत. समवेत उपस्थित शिख, पंजाबी व सिंधी समाज बांधव व महिला. दुसऱ्या छायाचित्रात माजी नगरसेविका सौ. शितल जगताप यांना बेबी नानकी महिला सक्षमीकरण पुरस्कार प्रदान करताना जनक आहुजा आदी.

# गुरुनानक देवजी जयंतीनिमित्त तारकपूरला रंगला किर्तन दरबार

## सतनाम वाहे गुरु... सतनाम वाहे गुरु....चा गजर; शितल जगताप यांना बेबे नानकी महिला सक्षमीकरण पुरस्कार प्रदान

नगर - शहरातील तारकपूर मधील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा गुरुनानक दरबार येथे शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांची ५५५ वी जयंती (प्रकाश पूरब) विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. बोले सो निहाल, सत श्री अकाल... चा जयघोष, अखंडपाठ व किर्तनच्या भक्तीमय वातावरणात जयंती सोहळा पार पडला. किर्तन दरबारच्या भक्तिरसात भाविक न्हाऊन निघाले. सतनाम वाहे गुरु... सतनाम वाहे गुरु....च्या गजराने वातावरण प्रफुल्लित झाले होते. यावेळी शीख, पंजाबी व सिंधी समाजबांधव व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाई कुंदनलालजी गुरुद्वाराच्या वतीने विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना गुरुनानक देवजी यांची बहिण बेबे नानकी यांच्या नावाने जनक आहुजा परिवाराच्या माध्यमातून गुरुनानक जयंतीनिमित्त पुरस्कार देण्यास प्रारंभ करण्यात आले आहे. सन्मान चिन्ह, रोख रक्कम, शाल व श्रीफळ या पुरस्काराचे स्वरुप आहे. या वर्षी पहिल्या पुरस्काराचे मानकरी शहरात महिला सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या माजी नगरसेविका शितलताई संग्राम जगताप ठरल्या आहेत. त्यांना बेबे नानकी महिला सक्षमीकरण पुरस्कार सुनीता जनक आहुजा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जयंती कार्यक्रमासाठी आलेले माजी आमदार अरुण जगताप, शितल जगताप, सचिन जगताप व पूजा गोंडाल यांनी गुरुग्रंथ साहिबाचे दर्शन घेऊन समाजबांधवांना जयंती उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी जनक आहुजा, राजेंद्र कंत्रोड, बबलू आहुजा, ब्रिजमोहन कंत्रोड, हरजीतसिंग वधवा, ठाकूर नवलानी, दामोदर बठेजा, जितू गंभीर, जय रंगलानी, अनिश आहुजा, गुलशन कंत्रोड, जसपाल कुमार, राकेश गुप्ता, विक्की कंत्रोड, किशोर कंत्रोड, राजीव बिंद्रा, मुन्ना जग्गी, लखी खुबचंदानी, जसपाल कुमार, प्रितपालसिंग धुप्पड, किशन पंजवानी, इंजि. केतन क्षीरसागर, अजिंक्य बोरकर, अर्जुन मदान, अमोल गाडे, अजय पंजाबी, डॉ. सुरेंद्र खन्ना, करण आहुजा, अभिमन्यू नय्यर, सुशील बजाज, कैलाश नवलानी, गिरीश नवलानी आदी उपस्थित होते.

हुशियारपूर येथील भाई प्रितमसिंगजी मिठा तिवाना यांच्या जथ्थ्याने गुरुनानक देवजी यांच्या जीवनावर किर्तन सादर केले. रंगलेल्या किर्तनमध्ये दुख भंजन तेरा नाम...., वाहे गुरु! वाहे गुरु.... अशा एकापेक्षा एक सरस किर्तनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. कीर्तनानंतर भाविकांना लंगरचे वाटप करण्यात आले. तर शुक्रवारी (दि.१५ नोव्हेंबर) गुरुनानक देवजी जयंतीनिमित्त अखंड पाठ साहेबची समाप्ती झाली.

जयंती उत्सवानिमित्त गुरुद्वाऱ्यात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# गुरू नानक देव



आज कार्तिक पौर्णिमा, आज शीख समुदायाचे लोक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्मोत्सव साजरा करतात. वास्तविक श्री गुरु नानक देवजी यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी झाला मात्र शीख धर्माचे अनुयायी त्यांचा जन्मोत्सव कार्तिक पौर्णिमेलाच साजरा करतात. गुरू नानक देवजी हे शीख धर्माचे संस्थापक व पहिले गुरु होते. गुरू नानक देवजी यांचा जन्म पाकिस्तानातील लाहोर जवळील तलवंडी येथे एका हिंदू कुटुंबात झाला. आजही या गावाला नानकना साहिब असे म्हणतात. गुरू नानक यांचा जन्मोत्सव प्रकाश पर्व म्हणूनही साजरा केला जातो. गुरू नानक देव लहानपापासूनच धार्मिक वृत्तीचे होते मात्र कर्मकांड आणि बुरसटलेले विचार त्यांना मान्य नव्हते म्हणूनच त्यांनी मौजीबंधनाच्यावेळीच जानवे घालण्यास नकार दिला होता होता. हिंदू धर्मातील कर्मकांड, बुरसटलेले विचार, अनिष्ट चालीरीती, विषमता, जातीभेद, स्त्रियांना दिली जाणारी हिन वागणूक त्यांना मान्य नव्हती म्हणूनच ज्ञान प्राप्तीनंतर त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. शीख धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी त्यांनी जगभर यात्रा काढली. या दरम्यान त्यांनी जगभरातील अनेक धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या. त्यांनी त्या काळात केवळ भारतातीलच धार्मिक स्थळांना नव्हे तर इराक मधील बगदाद आणि सौदी अरेबियातील मक्का मदिना या धार्मिक स्थळांनाही भेटी दिल्या. या दरम्यान त्यांनी शीख धर्माच्या तत्वांचा प्रसार आणि प्रचार केला. सर्वसामान्यांमध्ये देव आणि धर्माबाबत जागृती निर्माण करण्यासोबतच त्यांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेशही दिला. त्यांनी स्थापन केलेला शीख धर्म उदात्त, समतेच्या शिकवणुकीमुळे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात रुजला. आज शीख धर्माचे अनुयायी केवळ आशिया खंडातच नाही तर युरोप आणि अमेरिका खंडातही आहे. जगातील प्रमुख धर्मा पैकी एक धर्म म्हणून शीख धर्म ओळखला जातो. गुरू नानक यांची मानवतावादावर दृढ श्रद्धा होती. त्यांचे चिंतन धर्माच्या सत्य आणि शाश्वत मूल्यांचे मूळ होते म्हणूनच जात धर्म यापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र यावे, माणूस म्हणून एकत्र राहावे अशी त्यांची इच्छा होती. सर्व माणसे ही एकाच आईची लेकरे असून त्यांच्यात कोणीही उच्च नीच नाही असे ते मानत. जातीपाती मधील धर्मा धर्मामधील भेदभाव तर मान्य नव्हता. कोणीही हिंदू नाही, कोणीही मुसलमान नाही सर्व जण मानव आहोत असा नारा त्यांनी दिला. त्यांनी एकता, श्रद्धा आणि प्रेमाचे तत्वज्ञान मांडले. ते क्रांतिकारक विचारांचे होते. त्यांच्या विचारांमुळेच शीख धर्म साता समुद्रापार गेला. ७ सप्टेंबर १५३९ रोजी श्री गुरु नानक देवजी यांचे महानिर्वाण झाले. गुरू नानक देवजी यांना त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

## श्रमिक नगर येथून मोटारसायकलची चोरी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड परिसरात श्रमिक नगर येथे घराच्या पाठीमागील बाजूच्या गेट समोर लावलेली हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी (दि.१०) सायंकाळी ६ ते रात्री ११ या कालावधीत घडली आहे. याबाबत सागर अनिल जेटला (रा. श्रमिक नगर, पाईपलाईन रोड) यांनी सोमवारी (दि.११) सायंकाळी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## भिस्तबाग परिसरातून बुलेटची चोरी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - सावेडी उपनगरातील भिस्तबाग परिसरात कजबे वस्ती येथील माऊली कृपा अपार्टमेंटच्या पार्किंग मध्ये लावलेली क्लासिक कंपनीची बुलेट मोटारसायकल (क्रं.एम.एच.१६ बी पी १५९०) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी (दि.१०) सायंकाळी ६.३० ते सोमवारी (दि.११) सकाळी ६ या कालावधीत घडली आहे. याबाबत बहिरनाथ साहेबराव कजबे (रा. माऊली कृपा अपार्टमेंट, कजबे वस्ती, भिस्तबाग) यांनी मंगळवारी (दि.१२) तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## बँकेसमोरून मोटारसायकलची चोरी

नगर - बँकेसमोर लावलेली हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. एम.एच.१६ बी एक्स ९७२५) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना एमआयडीसी परिसरातील स्टेट बँकेच्या शाखेसमोर बुधवारी (दि.१३) सकाळी १०.४५ ते ११.३० वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. याबाबत रुपाली अविनाश लगारे (रा. जय मल्हारनगर, नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# जातीच्या आधारावर राज्य निर्मितीला मौलाना आझादांनीच विरोध केला होता

**प्रा.डॉ.अब्दुस सलाम यांचे प्रतिपादन**

नगर – देशाच्या फाळणीला ज्याप्रमाणे मौलाना आजाद यांनी प्रखर विरोध केला होता. त्याचप्रमाणे फाळणीनंतर देशात जातीच्या आधारावर निर्माण होणाऱ्या राज्यांनाही मौलानांनी कडाडून विरोध दर्शविला होता. मौलाना आजादांना देशाच्या फाळणीचे दुःख संपत नव्हते तर देशात जातीच्या संख्याबळाप्रमाणे राज्य निर्मितीचा मुद्दा पुढे येताच मौलानांनी विरोध करुन ते हाणून पाडले. व देशात भाषेच्या आधारावर राज्यांची निर्मिती करण्यात आली. मौलाना हे जाणून होते की, या देशात धर्माच्या आधारावर राज्य निर्माण झाल्यास आराजकता वाढेल व दोन समाजात अगोदरच फाळणीमुळे दरी वाढलेली होती, त्यात अजून भर पडली असती, असे मौलानांना वाटत होते. त्यामुळेच जाती वर आधारीत राज्यची निर्मिती न होता; ती भाषावार झाली, असे मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ.अब्दुस सलाम सर यांनी मौलाना आझाद व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना केले.



कौमी एकता सप्ताहामध्ये आयोजित मौलाना आझाद व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना प्रा. डॉ. अब्दुस सलाम. समवेत व्यासपीठावर प्रमुख पाहुणे दिसत आहेत.

## मौलाना आझाद व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प

मखदूम सोसायटीच्यावतीने मौलाना आजाद यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कौमी एकता सप्ताह मध्ये दुसरे व्याख्यानमाला आलमगीर येथील मातोश्री उर्दू हायस्कूल व अलहाज शेख अब्दुल अजीज ज्युनियर कॉलेज ऑफ आर्टस् मध्ये आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, मुख्याध्यापक जमीर शेख, प्रा. डॉ. एजाज शेख, आफरीन शेख, नसरीन तांबोली, मुझ्झमील शेख आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मुनीरा शेख यांच्या कुराण पठणाने झाली. तर हम्द खुतेजा सय्यद यांनी सादर केली. नातेपाक कैस शेख यांनी प्रस्तुत केली. मदीहा व इतर विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशात खान व शेख अंजुम यांनी केले. तर प्रास्तविक आबीद खान यांनी केले. आभार अंजुम शेख यांनी मानले.



## दिलीप सातपुते यांचा शिवसेना उध्दव ठाकरे पक्षात प्रवेश

अहमदनगर शहर शिवसेना (शिंदे) शहर प्रमुख दिलीप सातपुते यांचा श्रीगोंदा येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत प्रवेश झाला. यावेळी जिल्हा प्रमुख शशिकांत गाडे, तालुका प्रमुख राजू भगत, युवा सेनेचे सहसचिव विक्रम राठोड, युवा सेनेचे प्रशांत भाले, मुन्ना भिंगारदिवे, ओंकार सातपुते उपस्थित होते.

# मतदार जागृतीसाठी महानगरपालिकेच्या पुढाकारातून बाईक रॅली

## आयुक्त यशवंत डागे सहभागी; शहरातील तृतीयपंथीयांनीही केला १०० टक्के मतदानाचा संकल्प

नगर – विधानसभा निवडणुकीत शहरात मतदानाचा टक्का वाढावा, जास्तीत जास्त मतदान व्हावे, यासाठी नागरीक, मतदारांमध्ये जागृती करत आहोत. त्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर आज अहिल्यानगर शहरातून बाईक रॅली काढून मतदान करण्याचा संदेश देण्यात आला. तसेच, महानगरपालिकेच्या या जनजागृती अभियानात विविध संघटनांसह तृतीयपंथी संघटनाही स्वयंस्फूर्तीने सहभागी झाली असून, त्यांनीही शंभर टक्के मतदानाचा संकल्प केला असल्याची माहिती अहिल्यानगर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.





विधानसभा निवडणुकीत शहरात मतदानाचा टक्का वाढावा, जास्तीत जास्त मतदान व्हावे, यासाठी मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी महापालिकेच्यावतीने काढण्यात आलेल्या बाईक रॅलीला झेंडा दाखवताना आयुक्त यशवंत डांगे. शेजारील छायाचित्रात आयुक्तांसमवेत सहभागी झालेले मनपाचे अधिकारी–कर्मचारी.

मतदार जनजागृती अभियानाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत नगर शहरातून बाईक रॅली काढण्यात आली. यात आयुक्त यशवंत डांगे हे स्वतः ई बाईक घेऊन रॅलीत सहभागी झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा – माळीवाडा वेस – पंचपीर चावडी – आशा टॉकीज – माणिक चौक – भिंगारवाला चौक – कापड बाजार – तेलीखुंट चौक – नेता सुभाष चौक – चौपाटी कारंजा – दिलीगेट – न्यू आर्ट्स कॉलेज ते हुतात्मा स्मारक अशी ही रॅली काढण्यात आली. या रॅली नंतर महानगरपालिकेत तृतीयपंथी संघटनेच्या वतीने १०० टक्के मतदान करण्याचा संकल्प करण्यात आला.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करणे हे प्रत्येक मतदाराचे कर्तव्य आहे. नगर शहरात अधिकाधिक मतदान व्हावे, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. त्याला नागरिक, मतदारांसह विविध संघटनांचीही चांगली साथ मिळत आहे. महानगरपालिकेमार्फत शहरातील विविध घटकातील नागरिक, संघटना, दिव्यांग बांधव, तृतीयपंथी आदींमध्ये जनजागृती करून शंभर टक्के मतदानाचा संकल्प करणारी शपथ सर्वांना दिली जात आहे.

महानगरपालिकेच्या बस सेवा देणाऱ्या बसेस, बस स्टॉप, कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या आदींवर फलक लावून, जिंगल्स वाजवून मतदारांमध्ये जनजागृती केली जात आहे. मतदारांकडून संकल्पपत्र भरून घेतले जात आहेत. महानगरपालिकेतील देयके, विविध पावत्यांवर वॉटरमार्क द्वारे मतदार जागृतीचा लोगो छापण्यात आला आहे. सोशल मीडियात अधिकाऱ्यांमार्फत मतदारांना मतदानासाठी आवाहन केले जात आहे.

शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. विविध मॉर्निंग ग्रुप मध्ये चर्चासत्र घडवून आणत वेगळ्या प्रकारे जनजागृती केली जात आहे, असेही त्यांनी सांगितले.

### स्व. पंडित नेहरू यांच्या पुतळ्याला अभिवादन करून घेतली शपथ

मतदार जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या बाईक रॅलीचा हुतात्मा स्मारक येथे समारोप झाल्यानंतर आयुक्त यशवंत डांगे यांनी महानगरपालिकेच्या वतीने लालटाकी येथे स्व. पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर सर्वांनी मतदानाची शपथ घेऊन १०० टक्के मतदानाचा संकल्प केला.

# मतदार प्रतीक्षा व्यवस्थापन प्रणालीमुळे मतदान करणे अधिक सुलभ होणार

## जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून व्हीक्यूएमएस प्रणाली विकसित

नगर – जिल्ह्यातील मतदारांना मतदान करतांना अधिक वेळ रांगेत उभे राहावे लागणार नाही. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या संकल्पनेतून जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे विकसित करण्यात आलेल्या मतदार प्रतीक्षा व्यवस्थापन प्रणालीद्वारे मतदान केंद्रांवरील रांगेत उभ्या असलेल्या मतदारांची संख्या कळू शकणार आहे

बऱ्याचदा मतदान केंद्रावर गर्दी असल्याने मतदार अधिक वेळ रांगेत उभे न राहता मतदान न करता परत फिरतात. त्यांना अधिकवेळ प्रतिक्षा करायला लागू नये यासाठी मतदान केंद्रावरील रांगेची स्थिती त्यांना कळायला हवी ही कल्पना जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा बैठकीत मांडली आणि त्यासाठी प्रणाली विकसित करण्याची सूचना केली.

जिल्हा निवडणूक प्रशासनाने त्यादृष्टीने व्हीक्यूएमएस प्रणाली विकसित केली. मतदान केंद्रावर रांगेत उभ्या असलेल्या मतदारांची संख्या विशिष्ट कालावधीत मतदान केंद्रांवरील कर्मचारी या प्रणालीत रांगेत उभ्या असलेल्या मतदारांची संख्या अद्ययावत करतील. नागरिकांना vqms.online या लिंकवर जावून जिल्ह्यातील कोणत्याही मतदान केंद्रांवरील रांगेची स्थिती जाणून घेता येईल. त्यांना प्रथम मतदारसंघ आणि मतदार केंद्र निवडून प्रतीक्षा कालावधी माहीत करून घेता येईल आणि सोईच्या वेळी मतदान करता येईल.

मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, रॅम्प, स्वच्छता गृह, प्रतिक्षा कक्ष, मदत केंद्र आदी सुविधा करण्यात आल्या आहेत. मतदारांना मतदान करतांना कोणताही त्रास होऊ नये असे प्रशासनाचे प्रयत्न आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मतदारांना अधिक मतदान करण्यासाठी अधिक कालावधी लागू नये यासाठी ही सुविधा करण्यात आली आहे. मतदारांनी या प्रणालीचा उपयोग करून सुलभतेने मतदान करावे आणि जिल्ह्यात ७५ टक्के मतदानाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन श्री.सालीमठ यांनी केले आहे.


**Format C-1**

***(for candidate to publish in Newspapers, TV)***

**Declaration about criminal cases**

*(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

**Name and address of candidate:** सचिन चंद्रभान डफळ (नक्षत्रनगर, तपोवन रोड, अहिल्यानगर)

**Name of political party:** महाराष्ट्र नवनिर्माण सेना

*(Independent candidates should write "Independent" here)*

**Name of Election :** विधानसभा २२५

***Name of Constituency :** अहिल्यानगर (अहमदनगर)

I **Sachin Chandrabhan Dafal** (name of candidate), a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

| |
|---|
| **(A) Pending criminal cases - Ahmednagar** |
| **1) IPC Section -409,420, 34, Tophakhana Police Station RCC No. 877 / 2019, session Court Ahmednagar** |
| **2) IPC Section - 420, 34, Tophakhana Police Station RCC No. 1358 / 2022, session Court Ahmednagar** |
| **3) Punishment - NA** |
| **4) Punishment Imposed - NA** |


# आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत ऑक्झिलियम, ओऐंसीस, आठरे पाटील, डॉन बॉस्को, श्री साई स्कूलची विजयी घौडदौड

## रेहान तांबोळीने केली गोलची हॅट्रीक

नगर – शहरातील वाडियापार्क क्रीडा संकुल येथे स्टेअर्स फाउंडेशन व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर शालेय मुला–मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत खेळाडूंचे रंगतदार सामने होत आहेत. १४ व १७ वर्षे आतील मुलांच्या सामन्यांना प्रारंभ झाले असून, खेळाडूंच्या उत्कृष्ट खेळाच्या प्रदर्शनाने अटीतटीच्या सामन्यांचा थरार पहावयास मिळत आहे.

युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय (भारत सरकार) आणि राष्ट्रीय खेळ संवर्धन संस्था (एनएसपीओ) यांच्या मान्यतेने चार दिवसीय ही स्पर्धा घेण्यात आली आहे. १४ वर्षा आतील संघात ऑक्झिलियम कॉन्व्हेंट, ओऐंसीस, आठरे पाटील स्कूल व १७ वर्षा आतील संघात डॉन बॉस्को आणि श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने विजय मिळवून आघाडी घेतली. तर डॉन बॉस्कोचा खेळाडू रेहान तांबोळी याने गोलची हॅट्रीक नोंदवली.



शहरातील वाडियापार्क क्रीडा संकुल येथे स्टेअर्स फाउंडेशन व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर शालेय मुला–मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत १४ वर्षे आतील मुलांचा रंगलेला फुटबॉल सामना.

१४ वर्षे आतील मुलांमध्ये कर्नल परब विरुध्द ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलने ०–१ गोलने विजय मिळवला. या विजयासाठी स्वराज जाधव यांनी केलेला १ गोल महत्त्वाचा ठरला.

ओऐंसीस विरुध्द प्रियदर्शनी पब्लिक स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात ओऐंसीसचे खेळाडू शिवम दळवी, ओम पवार व आयुष जेवे यांनी प्रत्येकी १ गोल करुन ३–० गोलने प्रियदर्शनी पब्लिक स्कूलवर दणदणीत विजय मिळवला. ओऐंसीसच्या आक्रमक खेळी पुढे प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही.

आर्मी पब्लिक स्कूल (एमआयआरसी) विरुध्द आठरे पाटील पब्लिक स्कूल यांच्यात शेवट पर्यंत सामना रंगला होता. यामध्ये आठरे पाटीलचे खेळाडू ओम लोखंडे व शशांक गर्जे यांनी प्रत्येकी १ गोल करुन २–० गोलने आर्मी पब्लिक स्कूलचा पराभव केला.

१७ वर्षे आतील मुलांमध्ये डॉन बॉस्को विरुध्द माऊंट लिटरा स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात डॉन बॉस्को संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन ४–० गोलने विजय संपादन केले. या सामन्यात डॉन बॉस्कोचा खेळाडू रेहान तांबोळी याने गोलची हॅट्रीक करुन संघाच्या विजयासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. तर सिध्दांत कराळे याने १ गोल केला.

श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल विरुध्द पंडित नेहरु विद्यालय यांच्यात झालेल्या सामन्यामध्ये श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचा खेळाडू अमार शेख व स्वराज सुर्यवंशी याने प्रत्येकी १ गोल केला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोलचे खाते उघडता आले नाही. २–० गोलने श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलचा संघ विजयी ठरला. स्पर्धेचे पंच म्हणून सागर चेमटे, शशी गायकवाड, जोएल पिल्ले, ओम दंडवते, परेश म्याना, प्रणव पंडित, ऋषी कनोजिया काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्टेअर्स फाउंडेशनचे अध्यक्ष विजय कमलनाथ (टायरवाले), उपाध्यक्ष डॉ. प्रताप पटारे, विल्सेंट फिलिप्स, सचिव प्रसाद पाटोळे, सहसचिव सुभाष कनोजिया, खजिनदार मयूर टेमक, निलेश हराळे, वृषाली पटेकर, जावेद शेख परिश्रम घेत आहे.



माहेश्वरी समाजातील राधाकृष्ण परिवाराने खाकीदास मठाच्या प्रांगणात आयोजित सव्वालाख तुलसी अर्चना सोहळ्याप्रसंगी मोहनलाल मानधना, विजयदधीची महाराज पौरोहित्य करताना. समवेत तुलसी अर्चना सोहळ्यात पूजन करताना भाविक.

# महाराष्ट्रात प्रथमच सव्वा लाख तुलसी अर्चना सोहळा

## १६१ दाम्पत्यांचा सोहळ्यात सहभाग

नगर – येथील माहेश्वरी समाजातील राधाकृष्ण परिवाराने खाकीदास मठाच्या प्रांगणात कार्तिक एकादशीचे औचित्य साधून आयोजित केलेला सव्वा लाख तुलसी अर्चन सोहळा महाराष्ट्रातील पहिलाच ठरला! या सोहळ्यासाठी पंढरपूर येथून तुलसीची पाने मागवण्यात आली होती.

सोहळ्याचे यजमानपद मोहनलाल पराग मानधना, रितेश जुगलकिशोर मालणी आणि युगल बाळकिसन भुतडा यांनी भूषविले. पं.विजय दधीच महाराज (विशाखापट्टणम्) यांनी पौरोहित्य केले. १६१ दाम्पत्यांनी या ऐतिहासिक सोहळ्यात सहभाग घेतला होता.

तुलसी पूजन आणि तुलसी अर्चन सुरू असताना पं.विजयदधीची महाराज यांच्या अमृतवाणीमधून होणारे मंत्रोच्चार वातावरण भारावून टाकणारे ठरले. कार्तिक एकादशीस तुलसी पूजन करण्याचे महत्वही त्यांनी सांगितले.

या सोहळ्याचे सूत्रसंचलन मेघा बिहाणी आणि वैष्णवी लड्डा यांनी केले. राधाकृष्ण परिवाराच्या कार्याची माहिती अमोल सोनी यांनी दिली. फराळ महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

शहरात प्रथमच आयोजित केलेल्या या सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी राधाकृष्ण परिवाराने अथक परिश्रम घेतले. सर्वांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वी झाला. उत्तम नियोजन, पूजेची नेटकी मांडणी, कार्यकर्त्यांची प्रसन्नपणे चाललेली लगबग ही या सोहळ्याची वैशिष्ट्ये होती. भगवान श्रीकृष्णासह तुलसीमातेच्या जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला. या सोहळ्यास माहेश्वरी समाज बांधव उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## गुगलच सांगणार भविष्यातील दिशा!




आपल्या हातात स्मार्टफोन आल्यापासून अख्खं जग जवळ आलेय, हे खरे असले तरी स्मार्टफोन वापरणाऱ्या व्यक्तींची सर्व माहिती गुगलकडे जाऊ लागली आहे. स्मार्टफोन वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी काय आहेत, सवयी काय आहेत, त्या व्यक्ती कुठे जातात, कुठे किती वेळ व्यतीत करतात, कोणाला भेटतात, कोणाशी काय पत्रव्यवहार करतात ही सर्व माहिती गुगलकडे रोजच्या रोज जमा होत असते. गुगल आता आपल्या सर्वांच्या आयुष्यात इतका मिसळून गेला आहे, की त्याच्याशिवाय आयुष्याची कदाचित कल्पनाही करवणार नाही. अर्थातच, ही बाब खूप धोकादायक आहे. वेगवेगळ्या सर्व्हिसेसमधून, वेगवेगळ्या पद्धतींनी आणि युझर्स कसा वापर करतात त्या माध्यमातून गेल्या काही वर्षांपासून गुगल डेटा जमा करत आहे. गुगलकडे आजच्या घडीला जेवढा डेटा आहे, तेवढा कोणाकडेही नसेल. कदाचित आपण स्वतःलाही ओळखत नसू, एवढा गुगल आपल्याला ओळखत असेल.

आपण गुगलवर काय सर्च करतो, सर्चवर किती वेळ व्यतीत करतो, रोज कुठे जातो–येतो, कोणत्या सेवा घेतो, ऑनलाईन काय करतो, ऑनलाईन काय वाचतो, या सगळ्याची माहिती गुगलकडे साठवली जाते. असे म्हटले जाते, की युझर्सचे बोलणेही स्मार्टफोनवर अनेक ॲप्सच्या माध्यमातून रेकॉर्ड केले जात असते. ई–मेलमध्ये काय लिहिले जात आहे, यावरही गुगलची नजर असते. या सर्व माहितीच्या एकत्रीकरणातून गुगलला युझर्सचे वर्तन कळते. त्यातून युझरचे एक मोठे प्रोफाईल तयार केले जाते. त्यात तो काय करतो, त्याचं व्यक्तिमत्त्व कसे आहे, आवडी–निवडी काय आहेत, वर्तन कसे आहे, त्याची गुपिते काय आहे, याचा त्यात समावेश असतो. त्यातून तो त्या व्यक्तीचे सतत विश्लेषण करत राहतो.

गुगल मॅपसारख्या सेवा वापरणाऱ्या व्यक्ती कुठे प्रवास करतात, त्याची नोंद गुगलकडे होते. युझर किती वाजता घराबाहेर पडतो, कोणत्या मार्गाने कुठे जातो, कुठे थांबतो, ही माहिती युझरच्या नकळत रेकॉर्ड केली जाते. त्यामुळे सर्व रूटिन गुगलला कळते. तिकीट बुकिंगबद्दलही गुगलला कळते. साहजिकच, आता हवामानाच्या अंदाजाप्रमाणे येत्या काही दिवसांत गुगल असेही सांगू शकेल, की पुढच्या काही दिवसांत तुम्ही काय करणार आहात?

असे सांगितले जाते की, गुगलचा अल्गोरिदम अत्यंत हुशार आहे. तो युझर्सच्या डेटाचे विश्लेषण करून त्यातून असा काही निष्कर्ष काढतो, की कदाचित खुद्द युझरलाही स्वतःबद्दल इतकी माहिती नसेल. युझरच्या पर्सनॅलिटीची परिपूर्ण माहिती गुगल तयार करतो. युझर रोज कुठे राहतो, त्याच्या घरात कोण आहे, ही सगळी माहिती गुगलला फोटोज आणि संवादातूनही कळते. गुगलचा डेटा आता इतका समृद्ध झाला आहे, की प्रत्येक भागातल्या व्यक्तींचा स्वभाव, त्यांचे कल आणि समज आदी बाबींचे सहज वर्गीकरण तो करू शकतो. त्यामुळे आपण पुढील काही दिवसांत काय करणार आहोत, हे गुगलने सांगण्यात कठीण तसे काहीच नाही, ही देखील कटू वस्तुस्थिती!

## सर्वात झोपाळू देश !

सध्याच्या काळात नागरिक आपल्या आरोग्याबद्दल खूप सजग झाले आहेत. काही जण जेवण्याच्या, झोपण्याच्या वेळा कटाक्षाने पाळतात. निरोगी राहण्यासाठी व्यायाम आणि आहार जितका महत्त्वाचा आहे, तितकीच झोपदेखील गरजेची आहे. झोप पूर्ण झाल्याने फ्रेश वाटते, अनेक आजार टाळण्यास मदत होते. रोज पूर्ण झोप घेतल्याने हृदयाचे आजार होण्याचा धोका कमी होतो. ग्लोबल स्लीप स्टडीज २०२४मध्ये कोणत्या देशातले नागरिक सरासरी किती तास झोपतात, याबद्दल माहिती दिली आहे. या यादीत सर्वाधिक झोप घेणाऱ्या देशांच्या यादीत नेदरलँड अव्वलस्थानी विराजमान आहे. ग्लोबल स्लीप स्टडीज २०२४ नुसार, नेदरलँड्सचे नागरिक झोपेच्या बाबतीत जगात पहिल्या क्रमांकावर आहेत.




या अभ्यासात दिलेल्या माहितीनुसार, नेदरलँड्समधील नागरिक रोज सरासरी ८.१ तास झोपतात. नेदरलँड्नंतर या यादीत फिनलंडचा क्रमांक लागतो. फिनलंडचे नागरिक दररोज आठ तास झोपतात. अन्य देशांमध्ये झोपेचे प्रमाण न्यूझीलंड – ७.८ तास, यूके – ७.८ तास, कॅनडा ७.७ तास, डेन्मार्क ७.७ तास, अमेरिका ७.६ तास, जर्मनी ७.६ तास, स्वीडन ७.६ तास, इटली ७.५ तास, बेल्जियम ७.५ तास, स्पेन ७.४ तास, जपान ७.४, दक्षिण कोरिया ७.४ तास, ब्राझील ७.३ तास, रशिया ७.३ तास, मेक्सिको सरासरी ७.२ तास, इतके आहे. ग्लोबल स्लीप स्टडीज २०२४मधील माहितीनुसार, या यादीत ऑस्ट्रेलिया तिसऱ्या क्रमांकावर आहे. तेथील नागरिक ७.९ तासांपर्यंत झोपतात. यानंतर चौथा क्रमांक फ्रान्सचा आहे. तिथले नागरिकही ७.९ तासांपर्यंत झोपतात. झोपण्याच्या बाबतीत भारत या यादीत २०व्या क्रमांकावर आहे. या अभ्यासानुसार, भारतातील नागरिक सरासरी ७.१ तास झोप घेतात.

## कथा सर्वांत छोट्या विमानतळाची

आजकाल विमानाने प्रवास करणे साधारण होत चालले आहे. तसा आताही विमान प्रवास खर्चिकच आहे. पण, बऱ्याचदा वेळ महत्त्वाचा असतो आणि काही वेळा हौसेला मोल नसते. त्यामुळेही विमान प्रवासाला प्राधान्य दिले जाते. भारतासह जगभरातील देशांमध्ये विमानतळे आहेत. काही आंतरराष्ट्रीय विमानतळ इतके आलिशान आहेत की, प्रवासी तासन्‌तास तिथे थांबू शकतात. तर काही ठिकाणी विमानापर्यंत पोहोचण्यासाठी बस केल्या जातात; पण काही विमानतळे अगदीच छोटीशी असतात. एक विमानतळ तर इतके छोटे आहे की, तेथे वातानुकूलित शॉप्स सोडा, अगदी साधा आडोसा देखील नाही. या सर्वात छोट्या विमानतळावरून प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी प्रवाशांना येथे नजीकच असलेल्या आंब्याच्या झाडाखाली बसून विमानाची प्रतीक्षा करावी लागते.

भारतासह सर्व देशांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत. प्रवासी आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून उड्डाण करून जगभर प्रवास करतात. आजही विमानतळाचे नाव ऐकल्यावर सर्वसामान्य माणसाला काहीतरी मोठी गोष्ट करतोय, असं वाटतं. पण, या विमानतळावर असं काही नाही. कोलंबियातील अगुआचिका नावाच्या ठिकाणी हाकारितामा विमानतळ आहे, जे आपल्या लहान जागेमुळे जगभरात प्रसिद्ध आहे. या विमानतळावर दोनच वेटिंग एरिया आहेत. एवढेच नाही तर सामान तपासण्यासाठी येथे स्कॅनर नसून, ते मॅन्युअली तपासले जाते. प्रत्यक्षात येथे स्कॅनर मशिनला जागा नाही. शिवाय विमानतळावर येताना प्रवाशांना उन्हात रांगेत थांबावे लागते.



## एलियन्सबाबत बोलणेही खतरनाक

एलियन्स किंवा यूएफओ हा सुरुवातीपासूनच मानवासाठी उत्सुकतेचा विषय राहिला आहे. अंतराळात जीवन अस्तित्वात आहे की नाही, हे लोकांना नेहमी जाणून घ्यायचे असते. लोक आकाशात यूएफओ पाहिल्याचा दावा करतात आणि काही तज्ज्ञही त्याला दुजोरा देतात. एलियन्सबद्दल शास्त्रज्ञही अनेक दावे करत आहेत; पण एलियन्सबाबत बोलणेही खतरनाक ठरू शकतं, याबाबत शास्त्रज्ञांनी सावधानतेचा इशारा दिला आहे.

किंग्ज कॉलेज लंडनमधील संशोधक टोनी मिलिगन यांनी द कॉन्व्हर्सेशनमध्ये याचा उल्लेख केला आहे. नवीन संशोधनानुसार एलियन्सबद्दल अधिक चर्चा केल्याने व्यापक सामाजिक समस्या निर्माण होत आहे. हा विश्वास थोडासा विरोधाभासी आहे. कारण, एलियन अस्तित्वात असल्याचा कोणताही पुरावा आपल्याकडे नाही, असे ते म्हणाले.



**नेमकं काय म्हणाले शास्त्रज्ञ ?**

ते म्हणाले की, एलियन्स आपल्याला भेटायला येतील, असा विचार करणे मूर्खपणाचे वाटते. याशिवाय, तारा प्रणालींमधील अफाट अंतर लक्षात घेता, फक्त एका प्रवासात आपण त्यांच्याबाबत जाणून घेऊ, हे विचित्र वाटते. एलियन्सचे पुरावे दूरच्या ग्रहांवरून आलेल्या सिग्नल्सवरून मिळण्याची शक्यता जास्त आहे. मिलिगन म्हणतात की, खतरनाक आकडेवारी दर्शवते की जवळजवळ एक चतुर्थांश अमेरिकन लोकांचा असा विश्वास आहे की, त्यांनी यूएफओ पाहिला आहे. उल्लेखनीय म्हणजे, लुईस यांनी असेही सांगितले की, अमेरिकन सरकारला त्यांच्या अस्तित्वाबद्दल अनेक वर्षांपासून माहिती आहे आणि ते लपवत आहेत. यूएपी–कमिशन केलेल्या २०१९ गॅलप सर्वेक्षणानुसार, ६८ टक्के लोकांचा असा विश्वास आहे की, अमेरिकन सरकारला यूएफओबद्दल अधिक माहिती आहे. ते म्हणाले की एलियन्सवर सतत चर्चा केल्याने बाहेरील जीवनाचा शोध घेण्याचे खरे प्रयत्न देखील कमी होऊ शकतात. आपल्या ग्रहाच्या पलीकडे जीवसृष्टी आहे की नाही, याची पुष्टी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी आता अवकाशातील खडकाच्या काही तुकड्यांचा अभ्यास केला आहे.

गेल्या शतकात बाह्य अवकाशातील ढिगाऱ्यांचे तुकडे पृथ्वीवर पडले आणि त्यात न्यूक्लिओब्स आहेत, जे आकाशगंगेच्या पलीकडे जीवन दर्शवू शकतात. शास्त्रज्ञांनी उल्कापिंडात पाच विशेष डीएनए शोधले आहेत, जे एलियनच्या अस्तित्वाकडे निर्देश करू शकतात. शास्त्रज्ञ आता खडकांमध्ये सापडलेल्या पाच प्रमुख घटकांचं विश्लेषण करत आहेत, ज्यात ॲडेनाईन, ग्वानिन, सायटोसिन, थायमिन आणि युरासिलचे कोड समाविष्ट आहेत.

## कसला हा अद्‌भूत प्रकाश?



अंतराळात बरीच रहस्ये आहेत, ज्यांचा शोध शास्त्रज्ञ घेत आहेत. अंतराळाचे असे अद्भुत फोटोही सोशल मीडियावर पोस्ट होत असतात. अमेरिकन स्पेस एजन्सी नासा असे कितीतरी फोटो शेअर करत असते. नासाने शेअर केलेला असाच एक फोटो पाहून सर्वच जण थक्क झाले आहेत.

गडद आकाशातील ताऱ्यांमध्ये लाल–केशरी कोळ्यासारखा आकार, मध्यभागी गुलाबी आणि आजूबाजूला नारिंगी. हा अद्भुत असा प्रकाश पाहून सगळ्यांचे डोळे दिपले. हा प्रकाश नेमका कसला, असा प्रश्न अनेकांना पडला. नासाने फोटो शेअर करताना याबाबत माहितीही दिली आहे.

नासाने दिलेल्या माहितीनुसार आहे. हा रेड स्पायडर नेब्युला आहे. रेड स्पायडर नेब्युला पृथ्वीपासून ३००० प्रकाशवर्ष दूर आहे. नेब्युला म्हणजे वायू आणि धुळीचा एक मोठा ढग, जो ताऱ्यांमध्ये अंतराळात तरंगतो. रेड स्पायडर ब्युलामधील तारा सर्वात उष्ण ताऱ्यांमध्ये गणला जातो. ते त्याच्या सभोवतालचे वायू गरम करते, १०० अब्ज किलोमीटर उंच शॉकवेव्ह तयार करते.

या लाटा या प्रतिमेत दिसणाऱ्या स्पायडर लेगसारखा आकार तयार करतात. काही दिवसांपूर्वी शेअर केलेल्या या पोस्टला जवळपास सहा लाख लाईक्स मिळाले आहेत आणि अनेक युजर्सनी कमेंट सेक्शनमध्ये आश्चर्य व्यक्त केले

## अतिमौल्यवान हिऱ्यातले गणराया

सुरत येथील हीरा उद्योगपती कनु आसोदरिया यांच्याजवळ नैसर्गिकरीत्या मिळालेल्या हिऱ्यांचा गणेश आहे. गणेशाच्या आकाराचा हा हिरा कोहिनूर हिऱ्यापेक्षाही मोठा आहे. इतकेच नव्हे, तर बाजारात याची किंमत ६०० कोटी रुपयांपेक्षाही जास्त सांगितली जात आहे. गणपतीवर असलेल्या श्रद्धेपोटी कनु आसोदरिया यांनी अनेक मौल्यवान दगड एकत्र केले आहेत. खाणीत खोदकाम करत असताना त्यांना असे अनेक दगड सापडले होते. ते त्यांनी सुरक्षित ठेवले. त्यांनी नैसर्गिकरीत्या मिळालेल्या दगडात गणपतीची मूर्ती असल्याने त्यास सांभाळून ठेवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १५ वर्षांपूर्वी व्यावसायिक कनु आसोदरिया जेव्हा व्यवसायाच्या निमित्ताने बेल्जियम याठिकाणी गेले होते तेव्हा ते रफ डायमंड (कच्चा हिरा) घेऊन परतले होते. याचदरम्यान, त्यांच्या वडिलांना एक स्वप्न आले की, 'या रफ डायमंडमध्ये गणेशजी आहेत.' जेव्हा त्यांनी या रफ डायमंडला अत्यंत नीट पाहिले तेव्हा त्यांना त्यात गणेशाची मूर्ती दिसली आणि तेव्हापासून ते या हिऱ्याची पूजा करत आहेत. या रफ डायमंडचे वजन १८२.३ कॅरेट आणि ३६.५ ग्रॅम आहे. विशेष बाब म्हणजे, सुरत येथील हे गणेशजी इतने मौल्यवान आहेत की, त्यांची पूजा आणि दर्शन संपूर्ण वर्षभरात फक्त एकच दिवस केले जाऊ शकते.





कनुभाई यांनी गणेश चतुर्थीला आपल्या घरी जगातील सर्वात महागडा हिरा असलेल्या गणेशाची स्थापना केली. या हिऱ्याची नोंद लंडन येथे वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्सने जगातील सर्वात अद्वितीय म्हणून केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेव्हाही कनुभाई यांना या हिऱ्याच्या किमतीबाबत विचारले जाते तेव्हा, 'मी कधीच याबाबत विचार केला नाही. कारण माझ्यासाठी तो अनमोल आहे, हे एकच उत्तर ते देतात. हा रफ डायमंड म्हणजे कच्चा हिरा १८२ डायमंडचा आहे, जो कोहिनूर हिऱ्यापेक्षाही मोठा आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, 'हा एक नैसर्गिक हिरा आहे आणि ते आफ्रिकेत उत्खनन करताना तो मिळाला आहे. आम्ही त्याला इथे आणल्यावर एके सकाळी माझ्या वडिलांनी मला सांगितले की, आपण हिऱ्याच्यारूपाने गणेशाजवळ पोहोचलो आहोत. यानंतर जेव्हा आम्ही तपासणी केला तेव्हा आम्हाला या हिऱ्याच्या रूपाने गणेशाचा आशीर्वाद मिळाल्याचे जाणवले. गणेशोत्सवादरम्यान, त्याची पूजा केली जाते आणि गणेशजी कर्माचे देव असल्याने आम्ही या मूर्तीला 'कर्म गणेशा' नाव दिले आहे. तसेच हा हिरा सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

## चीनही जाणार आता चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर

चीनने आता आपल्या नव्या चांद्रमोहिमेची माहिती दिली आहे. ही मोहीम दोन टप्प्यांत होईल. त्यामध्ये चंद्राचा – पृष्ठभाग आणि कक्षेत नोड्सची एक श्रृंखला बनवली जाईल. चीन आणि रशिया या मिशनवर एकत्रितपणे काम करीत आहेत. दोन्ही देशांमधील तज्ज्ञांच्या संयुक्त पथकाच्या नेतृत्वाखाली इंटरनॅशनल लुनार रिसर्च स्टेशन (आरएलआरएस) बाबतचा रोडमॅप जून



'एक्सप्लोरेशन' संमेलनात 'आरएलआरएस'च्या दोन चरणांमधील योजनांची माहिती दिली. चीनी अंतराळ संशोधन परियोजनेचे मुख्य डिझायनर वू यानहुआ यांच्या माहितीनुसार, पहिला टप्पा चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ २०३५ च्या आसपास पूर्ण होईल आणि एक विस्तारित मॉडेल सुमारे २०५० पर्यंत बनवले जाईल. चीनचे हे मॉडेल एक व्यापक मून स्टेशन नेटवर्क असेल जे मून ऑर्बिट स्टेशनला आपल्या केंद्र व दक्षिण ध्रुव स्टेशनला प्राथमिक आधाराच्या रुपात उपयोगात आणेल. त्यामध्ये चंद्र भूमध्य रेखा आणि चंद्राच्या दूरवरच्या भागातील संशोधन नोड्स समाविष्ट होतील.

## गूढ विवराच्या विस्ताराचे

रशियातला सैबेरिया हा प्रदेश पूर्वीपासून काहीसा गूढ आहे. तिथे हाडे गोठवून टाकेल, असे थंड वातावरण आहे, तसेच घनदाट जंगले देखील आहेत. अशा या गूढ ठिकाणी असलेल्या याना नदीच्या खोऱ्याजवळ जमिनीत एक मोठे विवर (क्रेटर) आहे. ते जंगलांनी वेढलेले आहे. या विवराला बाटागायका क्रेटर असे म्हणतात. काही स्थानिक नागरिक याला गेटवे टू हेल असेही म्हणतात. सध्या हे विवर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. याचे कारण म्हणजे, या विवराच्या वाढत्या आकाराने शास्त्रज्ञांना गोंधळात टाकले आहे. आता हा खड्डा २०० एकर क्षेत्रावर पसरला असून, ३०० फूट खोल झाला आहे. बर्फ वितळल्यानंतर आणि पाणी वाहून गेल्यानंतर असे घडते, असे सांगण्यात येते.

झाकलेला होता. बर्फ वितळल्यानंतर ते दृष्टीस पडल्यावर, त्याचे फोटो पाहिल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले. कारण, या विवराची खोली इतकी जास्त होती, की लोक इथे जायला घाबरू लागले. म्हणूनच त्याला



वितळत आहे. नासा या अमेरिकी संस्थेच्या मते, पर्माफ्रॉस्ट म्हणजे जमीनच असते. ही जमीन कमीत कमी सलग दोन वर्षे शून्य अंश सेल्सिअस तापमानात पूर्णपणे गोठलेली असते. उत्तर आणि दक्षिण ध्रुवाजवळच्या भागात असे अनेक पर्माफ्रॉस्ट आहेत. त्यांनी पृथ्वीचा मोठा भाग व्यापलेला आहे. विशेषतः उत्तर गोलार्धात पृथ्वीच्या पृष्ठभागाचा एक चतुर्थांश भाग पर्माफ्रॉस्टखाली आहे. पर्माफ्रॉस्टमध्ये ८० टक्के बर्फ असतो. याशिवाय, तिथे माती किंवा वाळू किंवा काही वनस्पती असतात. बाटागायका विवर

# एस टी बसमधून प्रवासी महिलेचे दागिने गेले चोरीला

### तारकपूर बसस्थानकातील घटना, अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल

नगर - गेवराई - भिवंडी या एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्स मधून १ लाख ३७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना नगर शहरातील तारकपूर बसस्थानकात बुधवारी (दि.१३) सकाळी ९ च्या सुमारास घडली. याप्रकरणी गुरुवारी (दि.१४) रात्री तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आले.

याबाबत शामल रमेश विश्वासराव (रा. आणे, ता.जुन्नर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या बुधवारी त्यांच्या गावाकडे आणे येथे जाण्यासाठी गेवराई - भिवंडी या एस टी बसमधून प्रवास करत होत्या. सकाळी ९ च्या सुमारास बस नगर मधील तारकपूर बस स्थानकात आली असता त्यांच्या पर्स मधून कोणीतरी अज्ञात चोरट्याने सुमारे १ लाख ३७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरले. गावाकडे गेल्यावर ही बाब फिर्यादी यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी गुरुवारी नातेवाईकांच्या सोबत पुन्हा नगरला येत तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पायाभूत सुविधांची निर्मिती करताना क्रीडा संस्कृतीला चालना



जीवनात अभ्यासाला, शिक्षणाला जितके महत्त्व तितकेच खेळालाही असते. खेळामुळे शारिरीक आणि मानसिक विकास होतो. आपल्या नगर शहराला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजवणाऱ्या खेळाडूंची मोठी परंपरा आहे. आताच्या काळात विविध खेळांत चांगले करिअर घडविण्याच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. हे लक्षात घेऊन नगरमधील क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. वाडिया पार्क जिल्हा क्रीडा संकुलाचा कायापालट करण्याचे अभ्यासपूर्ण नियोजन केले आहे. यासोबतच सारसनगर, गंगा उद्यान परिसरात अत्याधुनिक स्पोर्टस् कॉम्प्लेक्स उभारणीस प्रारंभ केलेला आहे. दर्जेदार प्रशिक्षणामुळे येथील खेळाडू क्रिडा क्षेत्रात नाव कमवतील. नगरचा दबदबा निर्माण करतील.



आ.संग्राम जगताप

**माझ्या नगरकरांशी हितगुज - भाग ४**

राज्य, राष्ट्रीय पातळीवरील क्रीडापटूंची आणि क्रीडा प्रशिक्षकांची परंपरा शहराने प्रामाणिक मेहनतीने जपली आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यास मी अग्रेसर असतोच. वाडिया पार्क जिल्हा क्रीडा संकुलातील विकास कामांसाठी ५१ कोटींचा निधी राज्य शासनाने मंजूर केला असून १५ कोटी ५० लाखाचा पहिला हप्ता मनपाकडे वर्ग केला आहे. क्रिकेटसाठी टर्फ, ग्रीन ग्रास, फ्लड लाईट, स्प्रिंकलर, ४०० मी.चा सिंथेटिक ट्रॅक, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल या खेळांसाठीची मैदाने येथे साकारणार आहेत.

सारसनगर परिसरात तब्बल २ एकर जागेत अरूणोदय स्पोर्टस् कॉम्प्लेक्स उभारण्यात येणार असून त्यासाठी ११ कोटींचा निधीही प्राप्त झालेला आहे. या संकुलात बॅडमिंटन, लॉन टेनिस, बास्केटबॉल, कब्बडी, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस अशा विविध खेळांसाठी सुसज्ज मैदाने तयार केली जाणार आहेत. महिला व पुरुषांच्या सरावासाठी अत्यावश्यक सोयी सुविधांची येथे उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. हे क्रीडा संकुल येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी हक्काचे मैदान ठरेल. खेळाडूंना शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याकरिता तज्ज्ञ प्रशिक्षकांचीही येथे नियुक्ती केली जाणार आहे.

सावेडी उपनगरातील गंगा उद्यान शेजारील मनपाच्या जागेत नवीन स्पोर्टस् कॉम्प्लेक्स उभारण्यात येणार आहे. या कामासाठी ६ कोटी ५० लाखांचा निधी मिळाला आहे. येथे स्विमिंग पूल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, योगा हॉल, मेडिटेशन हॉल, वॉकिंग ट्रॅक, व्हॉलीबॉल, कबड्डी, खोखो ग्राउंड असणार आहे.

नगरचा खेळाडू राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करतो तेव्हा मनाला खूप आनंद होतो. अशा खेळाडूंच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे, प्रोत्साहन देणे हे मी माझे कर्तव्य समजतो. आपले शहर सर्वार्थाने स्मार्ट बनवण्यासाठी स्पोर्टस कॉम्प्लेक्सची अद्ययावत सुविधा देण्यास मी कटिबद्ध आहे. एकेकाळी आपले शहर लाल मातीच्या तालमींचे, पैलवानांचे म्हणून ओळखले जायचे. शहरातील लाल मातीच्या तालमींची परंपरा यापुढे सुरू रहाण्यासाठी मी जुन्या व नव्या पिढीतील नामांकित पैलवानांशी चर्चा करीत आहे. लहान मुलांना तालमीची सवय लागल्यास ते व्यसनाधिन होणार नाहीत. नवीन पिढी सक्षम करायची तर त्यांना खेळातून नक्कीच पाठबळ मिळू शकेल. आपले शहर उत्तम क्रीडानगरी बनू शकते, असा मला ठाम विश्वास आहे.

# शिवसेना ठाकरे गट आघाडीचा धर्म पाळणार



भगवान फुलसौंदर

नगर - नगर शहर विधानसभा मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी सरळ लढत रंगणार आहे. तसे पहायला गेले तर पारंपारिक शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा हा मतदारसंघ आहे. शिवसेनेचे दिवंगत उपनेते अनिल राठोड यांनी या मतदारसंघात सलग ५ वेळा विजय मिळवण्याची कामगिरी केली. नगरच्या जनतेने नेहमीच शिवसेनेला पाठबळ व प्रेम दिले आहे. मागील दोन टर्म राष्ट्रवादी काँग्रेसने या मतदारसंघात विजय मिळवला असला तरी त्यांचे मताधिक्य अल्पस्वल्पच राहिलेले आहे. अशा परिस्थितीत बदलल्या राजकीय परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट विरूद्ध शिवसेना ठाकरे गट अशीच लढत अपेक्षित होती. काही कारणांनी वरिष्ठ पातळीवर झालेल्या निर्णयानुसार नगरची जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सुटली व माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्या सारखा युवा चेहरा निवडणुकीत उतरला आहे. महाविकास आघाडीला राज्यात सत्तेवर आणायचे या उद्देशाने आम्ही सर्व नाराजी, अंतर्गत वाद बाजूला ठेवून एकदिलाने कळमकर यांना पाठिंबा दिला आहे. स्व. अनिल राठोड यांच्या नंतर कळमकर यांच्या रूपाने आम्ही नगर शहरात आमच्या विचारांचा उमेदवार विजयी करण्यासाठी जीवाचे रान करत आहोत. शिवसेनेला माननारे मोठे मतदार कळमकर यांच्या बाजूने उभे ठाकले आहेत. आज शहराला राठोड यांच्या सारख्याच सर्वांना आपलेसे करणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. कळमकर यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. सुसंस्कृतपणा आहे. समोरून प्रचंड दहशत, पैशाची मस्ती दर्शवली जात आहे. पण आम्ही सगळे नगरकरांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी कटिबद्ध आहोत. कोणी कितीही विकासाकामांचे दावे करीत असले तरी नगर शहर दहा वर्षात भकास बनले आहे. गुंडगिरी, कंपूशाही वाढलेली आहे. सर्वसामान्यांना लोकप्रतिनिधीची भीती वाटते अशी परिस्थिती आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी बदल आवश्यक आहे. तो बदल करण्याची संधी या निवडणुकीत नगरकरांना मिळाली आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत स्व. अनिल राठोड व निष्ठावान शिवसैनिकांनी पायाला भिंगरी लावून प्रचार करीत मित्र पक्षाच्या उमेदवाराला नगर शहरात सर्वाधिक विक्रमी मताधिक्य मिळवून दिले होते. अर्थात नंतर त्या उमेदवाराने आम्हाला दगाफटका केला. परंतु निष्ठावान शिवसैनिक नेहमीच शब्दाला जागत आला आहे. यावर्षीही तो कळमकर यांनाच मित्र म्हणून साथ देईल. शहरात ओबीसी समाजाचे प्राबल्य आहे. या ओबीसींच्या मनात नैराश्य आहे. मागील निवडणुकीत ज्यांना साथ दिली त्यांनी पुरता भ्रमनिरास केला हे त्यांच्या मनात सलते आहे. त्यामुळे या वेळी ओबीसी वादळ कळमकर यांच्या पाठिशी उभे राहून परिवर्तनाचे प्रमुख शिल्पकार ठरतील. नगरमध्ये ज्यांच्या विरोधात स्व. अनिल राठोड यांनी अविरत संघर्ष करून नगरकरांना भयमुक्त ठेवले तेच पर्व आता कळमकर यांच्या रूपाने पुन्हा सुरू होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असे शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी म्हटले आहे.

# महायुतीचे उमेदवार संग्राम जगतापांच्या प्रचारार्थ भाजपच्या शहरात प्रचार फेऱ्या

नगर - महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांच्या नेतृत्वाखाली नगर शहरात विविध भागांमध्ये प्रचारफेऱ्या काढण्यात येत आहेत. या प्रचार फेरीमध्ये भाजपचे पदाधिकारी सहभागी होत उमेदवार संग्राम जगताप यांना मतदान करण्याचे आवाहन नागरिकांना करीत आहेत.



महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ भाजपने काढलेल्या प्रचार फेरीत सहभागी कार्यकर्ते

यावेळी अभय आगरकर म्हणाले, नगर शहरामध्ये महायुतीला चांगले वातावरण असून उमेदवार आ.संग्राम जगताप यांना चांगला प्रतिसाद सर्व भागातून मतदार बंधू भगिनी देत आहेत. आमदार संग्राम जगताप यांनी केलेल्या विकास कामांच्या मुद्द्यावरच ही निवडणूक लढवण्यात येत आहे. राज्यातील महायुती सरकारने नगर शहराच्या विकासासाठी दिलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीमुळे नगर शहरांमध्ये सर्व भागांमध्ये विकास कामे प्रगतीपथावर आहेत. भविष्यात राज्य सरकारकडून आणखीन भरीव निधी प्राप्त होण्यासाठी नगरमधून संग्राम जगताप यांचा विजय होणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांनी विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान करून महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांना बहुमताने विजयी करावे, असे आवाहन केले.

यावेळी सुनिल रामदासी, मालन ढोणे, प्रशांत मुथा, संजय ढोणे, अजय ढोणे, दत्ता गाडळकर, पंडित वाघमारे, कालिंदी केसकर, अभिजीत ढोणे, प्रवीण ढोणे, सुरेखा विद्ये, राजू मंगलारप, प्रिया जानवे, श्री.फुलारी, सविता कोटा, ज्योती दांडगे, शुभम जाधव, राहुल मुथा, बंटी ढापसे, ज्ञानेश्वर काळे, राजू विधे, वैभव लांडगे, गोपाल वर्मा, राहुल रासकर, श्वेता पांधडे, मयूर बोचुघोळ, साहिल शेख, ज्ञानेश्वर भांगे, राजू वाडेकर, अमोल निस्ताने, मिलिंद गंधे, गोकुळ काळे, अर्चना बनकर, बाळासाहेब गायकवाड, ज्ञानेश्वर धिरडे, भार्गव फुलारे, रुद्रेश अंबाडे, विकी आव्हाड, कैलास शिंदे, केतन घोधडे, प्रताप परदेशी, प्रशांत आडेप, अजित कोतकर, तन्मय बारसे, महेश साबळे, युवराज ससाणे, सोनू बोरुडे, रोहीत परदेशी, दीपक उमाप, राखी आहेर आदी उपस्थित होते.

# महायुतीच्या उमेदवाराला मतदान करावे का?

### अहिल्यानगरकरांसाठी धोक्याची घंटा : अपक्ष उमेदवार उत्कर्ष गिते



नगर - आज अहिल्यानगरमध्ये कित्येक हिंदू नागरिक आहेत ज्यांचा भारतीय जनता पार्टी व वैचारिक बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना यांच्यावर विश्वास आहे व आज महायुतीच्या मायाजाळ मधून ते घड्याळाला मतदान करून पाहत आहे त्यांनी हा विचार करणे गरजेचे आहे की जर अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकीच्या निकालानंतर युतीत सरकार न करता पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात घर वापसी केल्यानंतर त्यांच्या पक्षातल्या आमदारांची हिंदुत्वा प्रति काय भूमिका असेल. आज अवघ्या भारताला हिंदू रक्षणाची गरज आहे त्या संदर्भात कोणी काम करताना दिसत नाही. त्यात विकासाची भुरळ घालून व महायुतीची झालर घेऊन जर आपण हिंदुत्ववाद्यांकडून मतदान अपेक्षित करत असाल तर भविष्यात अहिल्यानगरमधून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षातील उमेदवार हे हिंदुत्वासाठी काय काम करतील त्यांनी जाहीर करावे अहिल्यानगरचे नाव पुन्हा बदलून अहमदनगर व्हायला हवं व अहिल्यानगर जे झालं ते योग्य आहे याच्यावर भूमिका त्यांनी मांडावी.

अहिल्यानगरमध्ये कित्येक ठिकाणी कत्तलखाने व ठिकठिकाणी होत असलेल्या लवजीहादवर यांची भूमिका स्पष्ट करावी. वक्फ बोर्ड रद्द व्हायला हवा की नाही? अहिल्यानगरकरांना दिवसाला पाच वेळेस होत असलेला त्रास म्हणजेच मशिदीवरील भोंग्यांचा त्रास या त्रासाला संपुष्टात आणण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार काय पाऊल उचलणार? एमजी रोडवरील अतिक्रमणावर त्यांची काय भूमिका आहे? हे त्यांनी स्पष्ट करावे.

अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे नेते छगन भुजबळ यांनी एका प्रकाशनदरम्यान ईडीची भीती दाखवत आम्हाला मजबूर केल्याचा दावा केलेला आहे हाच संकेत भविष्यात महायुती टिकणार नाही हे समजण्यासाठी पुरेसा आहे व तसा असेल तर अहिल्यानगरमधल्या भाजप कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी व वरिष्ठ हिंदुत्ववाद्यांनी एकदा पुन्हा विचार करून आपली ताकद योग्य पर्यायाच्या मागे लावून अहिल्यानगर वाचवून भविष्य सुरक्षित करण्यासाठी काम करणं गरजेचं आहे. भाजपने विरोध करूनही जर अजित पवार नवाब मलिक यांना उमेदवारी देऊन त्यांच्या प्रचारास जात असतील तर याची काय शाश्वती आहे की हिंदूंवर अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा अहिल्यानगरचा उमेदवार योग्य तो न्याय करेल आज अहिल्यानगरमध्ये रस्ता पाणी वीज सोडून इतरही अनेक प्रश्न आहे ज्यांच्यावर कधीही कुठल्याही पक्षाचा माणूस बोलताना सहजासहजी दिसत नाही व्यापारी त्यांचा उद्योग करून त्यांचे पोट भरतात त्यांना सुरक्षा ही धर्माची व संस्कृतीची हवी आहे. त्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन्ही उमेदवार अजित पवार गटाचे संग्राम जगताप व शरद पवार गटाचे अभिषेक कळमकर हे काय पाऊल उचलतील.

हिंदूंसाठी काय काम करतील या दृष्टिकोनातून एखादी प्रेस कॉन्फरन्स घेऊन त्यांचं मत मांडणे गरजेचे आहे. विकास पण नेमकं कसला वा कोणाचा? सर्वसामान्य हिंदू जनतेचा की निवडणुकीच्या काळात एकगठ्ठा मतदान करणारे भारताचे दुसऱ्या क्रमांकाचे बहुजन, स्वतःला अल्पसंख्याक म्हणणारे मुसलमान बांधव यांचा? असा सवाल अपक्ष उमेदवार उत्कर्ष राजेंद्र गिते यांनी केला आहे.

# मतदारांना मतदान केंद्राकडे जाताना रस्त्यांच्या कामामुळे अडचण होणार नाही याची दक्षता घ्या

नगर - अहमदनगर शहर विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यांची जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी पाहणी केली. रस्त्यांच्या कामांमुळे मतदारांना केंद्राकडे जाण्यास अडचण होणार नाही यादृष्टीने उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिले.



अहमदनगर शहर विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यांची जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी पाहणी केली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संजय शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी अहमदनगर शहर विधानसभा मतदार संघातील सेंट झेविअर, सेंट मोनिका, न्यू आर्टस् कॉलेज या मतदान केंद्रांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या कामांना भेट देऊन पाहणी केली. मतदान केंद्राकडे जाणाऱ्या मार्गावर रस्त्यांची कामे सुरू आहेत. या कामांमुळे मतदारांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. मतदान केंद्रावर मतदारांना वाहन नेता येईल, अशा पद्धतीने व्यवस्था करावी. येत्या १६ नोव्हेंबरपासून मतदान केंद्राकडे जाणारे रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्याच्या सुचनाही त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना केल्या.

# मला मतदान करणे हीच खरी अनिल राठोड यांना श्रद्धांजली : मनसे उमेदवार सचिन डफळ

नगर - सर्वसामान्यांचे असामान्य नेतृत्व म्हणून स्व. अनिल राठोड यांची महाराष्ट्राला ओळख होती. तळागाळातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्यानंतर दुर्दैवाने असे नेतृत्व नगर शहरात उभे राहिलेले नाही. त्याचाच गैरफायदा घेऊन राजकारणाच्या माध्यमातून गुन्हेगारी, ताबेमारी, गुंडागर्दी, मारामाऱ्या, भांडणं हाच शहराचा चेहरा बनला. त्याचा प्रतिकार करण्यासाठी पुन्हा एकदा अनिल राठोड यांच्या रूपातील नेतृत्व शहरात उभे राहण्याची गरज आहे.

माझ्या आजवरच्या राजकारणात मी स्वतः स्व. अनिल राठोड यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले आहे. आपल्या अहिल्यानगर विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने इंजिन या चिन्हावर ही निवडणूक मी लढवीत आहे. खऱ्या अर्थाने मला मतदान करणे, हीच स्व. अनिल राठोड यांना श्रद्धांजली ठरेल याचा सर्व नगरकरांनी विचार करावा, असे आवाहन उमेदवार सचिन डफळ यांनी केले आहे.



गेले दहा वर्ष नगर शहर जगताप कुटुंबीयांना आंदण म्हणून दिले आहे की काय अशीच परिस्थिती निर्माण झालेली होती व सध्या देखील आहे. या दहा वर्षांच्या काळामध्ये शहरातील विकासाचा कोणताही प्रश्न मार्गी लागलेला नाही. नुसती धुळफेक करण्यात आली. मंजूर करण्यात आलेले रस्ते दोन वर्ष तसेच लटकवून ठेवून आणि निवडणुकीच्या काळात त्यांची कामे सुरू करत लोकांना भुलविण्याचे काम झाले. शहराच्या आसपासच्या भागातील उपनगरातील अनेक मोकळ्या जागांवर आपल्या पंटरांच्या माध्यमातून ताबेमारी करत त्या बळकवण्याचे काम झाले. शहरातील अनेक बिल्डर, बांधकाम व्यावसायिक यांच्याबरोबर भागीदारी करून मोठा पैसा तिथे गुंतविण्यात आला आहे. शहराच्या प्रत्येक गल्लीबोळात त्यांचे पंटर कम कार्यकर्ते दहशत निर्माण करत आहेत. या दहशतीमुळे त्यांच्याविरुद्ध काही बोलण्याची कोणाची हिम्मत होत नाही. लोकशाही मानणाऱ्या आपल्या देशात ही बाब निश्चितच चांगली नाही. त्यामुळेच आज स्व. अनिल राठोड यांची पुन्हा आठवण येते.

विद्यमान आमदारांच्या विरोधात वेगवेगळ्या प्रकारचे अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अशा शक्तीचा नायनाट करायचा असेल तर स्व. आमदार अनिल राठोड यांच्यासारखेच तडाखेबंद, अन्यायाविरुद्ध लढा देणारे दोन हात करणारे सक्षम नेतृत्व उभे राहण्याची गरज आहे. तसा प्रयत्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. माझ्या या प्रयत्नांना नगरकरांनी मनापासून साथ द्यावी. मी त्यांचा अपेक्षाभंग होऊ देणार नाही, असे आश्वासन देतो आहे, असे मनसे उमेदवार सचिन डफळ यांनी पत्रकात म्हटले आहे.





नगरसेविका स्व. सौ. विजयाताई अजय दिघे यांच्या १० व्या पुण्यस्मरणदिनी बालघर प्रकल्पाला किराणा साहित्य व अन्नदान करताना अजय दिघे. समवेत दिघे परिवारातील सदस्य.



# स्वामी टेउराम मंदिर ट्रस्टच्यावतीने कार्तिक महोत्सवनिमित्त शोभायात्रा

नगर - कार्तिक महिन्यात देशभरात विविध मंदिरात पहाटेच्या वेळी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते अहिल्यानगरच्या माळीवाडा भागातील पारगली येथील प्रेम प्रकाश आश्रमच्या श्री स्वामी टेउराम मंदिर ट्रस्ट च्या वतीने कार्तिक महोत्सव निमित्त १२ ते १५ नोव्हेंबर पर्यंत परिसरातून पहाटेच्या वेळी शोभायात्रा काढण्यात आली होती.

त्याचा समारोप कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी करण्यात आला. यावेळी भाविक, समाज बांधव सहभागी झाले होते. संपूर्ण देशभरातील मंदिरा मध्ये अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शोभायात्रा माळीवाडा येथील मंदिरात आल्यानंतर आरती करून त्याची सांगता करण्यात आली. यावेळी वर्षभर येथील मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात असते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## हॉस्पिटलसाठी जागा भाड्याने देणे

मार्केटयार्ड भाजीपाला गेटशेजारी सावता लॉजमागे ४३०० स्क्वे.फूट जागा हॉस्पिटल, एजन्सी, ऑफिससाठी सर्व सोयी-सुविधांनी उपयुक्त.

- संपर्क -
**8275192255**

## जाहीर नोटीस उत्तर

डि. अहमदनगर सब डि. ता. नगर येथील मौजे केडगाव येथील सर्व्हे नं. १४२/२ब मधील ९१५.८२ चौ. मी. चे संदर्भात मालक १. देवेंद्र भवरलाल बायड, २. अनिता दिलीप बायड, ३. किशोर मोडालाल बायड व ४. ओमप्रकाश मोडालाल बायड यांच्या मालकीची वरील मिळकत खरेदी घेण्याबाबत ची नोटीस ता. १२/११/२०२४ च्या नवा मराठा मध्ये प्रसिध्द झालेली त्यामध्ये खुलासा करण्यात येतो की,

सदर मिळकत बरोबर इतर मालकांची सदर नंबर मधील क्षेत्र आमच्या अशिलाने घेण्याचे ठरवुन आमचे अशिल नामे पुनीत केवल दुग्गल यांनी त्यांच्या वडिला बरोबर केलेल्या साठेखतावरुन दावा केला होता. त्यावर विरुध्द निकाल लागल्याने रे. अपील नं. १९६/२०२४ चे केलेले असुन सदरचे अपील न्यायप्रविष्ठ आहे व त्यामध्ये सदरचे वरील विद्यमान मालक हे रेस्पाँडन्ट नं. ५ ते ८ आहेत. वरील नोटीसीमध्ये उल्लेख केलेल्या सदर मिळकत ही निजोखमी, निर्वेध आहे असा जो उल्लेख करण्यात आलेला आहे तो संपुर्णतः खोटा व बनावट आहे हे दिसुन येत आहे. तरी या नोटीसीचे खुलाशाने तमाम लोकास कळविण्यात येते की, ही जमिन कोणीही खरेदीने घेऊ नये अन्यथा लिज पेंडन्सी च्या तत्वाचा बाध येऊन दिलेले खरेदीखत बेकायदेशीर होईल. तरी तमाम लोकास असे सुचीत करण्यात येते की, वरील न्याय प्रविष्ठ प्रकरणाची जो पर्यंत पुर्ण सुनावणी होत नाही तो पर्यंत खरेदी व विक्रीचे व्यवहार यांचेशी करु नये.

अशा प्रकारे तमाम लोकास या जाहिर नोटीसीने खुलासा दिला असे.

ता. १५/११/२०२४
अहमदनगर

**ॲड. स्वप्नील सतिष बिहाणी**
०५, रामकमल बंगला, तारकपुर स्टॅण्ड समोर, विराज इस्टेट अहमदनगर

## रो-हाऊस विकणे

एकनाथ नगर, केडगाव, अहमदनगर येथील **2 BHK** रो हाऊस विकणे आहे.
(पाण्यासाठी स्वतंत्र बोअर)
संपर्क:- 9260025519

## गाळा भाड्याने देणे

बालिकाश्रम रोडटच मोक्याच्या ठिकाणी गाळा भाड्याने देणे
9595525673
9272723421

## गाळा भाड्याने देणे

बुऱ्हानगररोड रोडटच, महात्मा फुले चौक, नागरदेवळे येथे, गोडावूनसाठी गाळा भाड्याने देणे आहे.
**8421488521**

## तपोवन रोड,अ.नगर येथे 3BHK घर विकणे आहे

व्हि.के.कन्स्ट्रक्शन
With Material Contractor
सागर हॉटेलमागे, पाईपलाईन रोड, सावेडी, अ.नगर
**9403566821**

## 2BHK रो-हाऊस विकणे

श्रीकृष्णनगर,नेप्ती रोड, केडगाव,अहिल्यानगर
**7020095005**

## पाईपलाईन रोड टच १८०० स्के. फूट

दुकान / शॉप, बँक, ऑफिस, पतसंस्था, हॉस्पिटल, सुपर शॉपी साठी भाड्याने देणे आहे.
**9923228111**

## भाड्याने देणे

वाळकी ता.नगर येथील भारत पेट्रोलियम कं.चा पेट्रोलपंप भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे
9421588875
9075516755

## पाहिजेत

वाळकी ता.नगर येथील पेट्रोलपंपावर महिला कामगार घेणे आहे
**9421588875**

## पाहिजेत

नगर शहरातील नामांकित शारदा एजन्सीमध्ये काम करण्यासाठी हेल्पर (मुले) फूल/पार्ट टाईम पाहिजेत
**9423791712**

## कार ड्रायव्हर कम वॉचमन जोडपे पाहिजे

श्रीराम चौक जवळ राहणाऱ्या (नवीन बंगल्यावर) शाकाहारी फॅमिली करिता कार ड्रायव्हर तसेच सर्व कामाकरिता सुशिक्षित जोडपे त्वरित पाहिजे. राहण्याची उत्तम सोय.
**9373928971**

## ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत

विगेन इंडिया कंपनीच्या अहमदनगर ब्रँचमध्ये ऑफिस कामासाठी **मुली पाहिजेत.**
शिक्षण : १२ वी ते पदवीधर
**9604609130**

## पाहिजेत

सेल्समन- 2 जागा
(फिरतीवर, पुरुष)
ड्रायव्हर+हमाल- 1 जागा
(आकर्षक पगार)
**गोरक्ष सेल्स**
नगर-पाथर्डी रोड, हनुमान चौक वडारवाडी, भिंगार
**9011137513**

## पाहिजेत

रिसेप्शनिस्ट -१
सिस्टर - २
वॉर्डबॉय - १
(वेळ- सायं. ५ ते रात्री १०)
**व्हाडणे हॉस्पिटल**
लालटाकी, अप्पूहती चौक, अहिल्यानगर
0241-2430411
2430221

## अकौंटंट पाहिजेत

संगणक आणि टॅलीचा अनुभव आवश्यक
जागा : १
दैनंदिन कामासाठी नवीन अकौंटंट
: जागा - १
**9021082240**

## बेकरी प्रॉडक्ट मार्केटींगकरिता पाहिजेत

सेल्समन : ४
(किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक)
**9257565756**

## *Life Changing Opportunity*

For Life / Health / General Insurance, Mutual Fund Agents, and Employee, Earn Fixed Monthly Income 50 K per Month, plus 30-50 Lakh As Commission
Call for Appointment
**Rajendra - 9763265518/9370025099**

## पाहिजेत

बँकेच्या कामासाठी टेलीकॉलिंगसाठी मुली पाहिजे
(इंग्लिश प्राधान्य)
जागा : २० (मुली/मुले)
शिक्षण : पदवीधर
डौले हॉस्पिटल शेजारी,सावेडी, अ.नगर.
**8888841388**

## पाहिजेत

सेल्स गर्ल - जागा - ५
लेडीज पंजाबी ड्रेस काउंटर सेल करीता अनुभवी सेल्स गर्ल्स पाहिजे
फक्त अनुभवींनी खालील पत्यावर समक्ष भेटावे, मनासारखा पगार दिला जाईल.
**M/S RIYA**
पत्ता - शॉप नं. ६, वेदांत आयकॉन, ग्राऊंड फ्लोर, दत्त मंदिर रोड, प्रेमदान चौक, नोबेल हॉस्पिटल जवळ, सावेडी, अ.नगर

## अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप.बँक लि.

प्रधान कार्यालय - प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अ.नगर ४१४००१.
फोन नं. : ०२४१-२३२२२२२

### जाहीर निविदा

अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., अहमदनगर या बँकेची मौजे नागापुर, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर येथील अहिल्यानगर म.न.पा. हद्दीतील सि.स.नं.९७७ / बी वर बांधलेल्या सुरज हाईटस्, मधील ऑफिस नंबर १/ए ज्याचे क्षेत्र २०९.११ चौ.मी. ही मालमत्ता फर्निचरसह आहे त्या स्थितीत विकावयाची असून निविदा मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त मालमत्ता एम. आय. डी. सी. जुन्या शाखेच्या पत्त्यावर बँकेच्या कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस सोडून) पहावयास मिळेल.

निविदा फॉर्म शनिवार दिनांक १६/११/२०२४ पासुन बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत मिळतील. निविदा मध्ये भाग घेवू इच्छिणाऱ्यांनी रक्कम रुपये १,०००/- निवीदा शुल्क भरल्यानंतर निवीदा फॉर्म बँकेच्या प्रधान कार्यालयाकडून मिळेल.

इच्छुक व्यक्तींनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिनांक २५/११/२०२४ दुपारी ५.०० वाजेपावेतो सिलबंद पाकिटात सादर कराव्यात.

निविदेच्या अटी व शर्ती व इतर नियम बँकेच्या मार्केट यार्ड येथील प्रधान कार्यालयात बँकेच्या कामकाजाच्या दिवशी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त करता येतील. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार/हक्क बँकेने राखून ठेवलेला आहे.

ठिकाण - अहमदनगर, दिनांक - १४/११/२०२४

| सुनिल पुराणिक | अमित मुथा | हस्तीमल मुनोत |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | व्हाईस चेअरमन | चेअरमन |



## माझे मत सामान्य कार्यकर्त्याला, सच्चा हिंदुला!

मी तो हिंदु नाही,
स्वयंम घोषित भगवाधारी, मतासाठी हिरव्यांचे
पायधरी, विकास कामांच्या महा टक्केवारीतून
पापांचा पैसा घेऊन मत विकणारा
**मी तो हिंदू नाही!**

माझे मत **सचिन डफळ** यांना!

निशाणी : रेल्वे इंजिन

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अधिकतृ उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
|---|---|---|---|
| ३ | सचिन चंद्रभान डफळ | | |

रेल्वे इंजिन या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्क्याने विजयी करा!

प्रकाशक : मनोज सुखदेव राऊत, मनसे जिल्हा उपाध्यक्ष, अ.नगर



## डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक प्रसिध्द निहोन- कोहेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

**अक्षय (गिते) हॉस्पिटल**
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

एशियन नोबल हॉस्पिटल — प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

## दशक्रिया विधी



**स्व.गणेश आनंदा जाधव**
स्व.दि. ०८.११.२०२४

**दशक्रिया विधी : रविवार दि.१७/११/२०२४ रोजी सकाळी ८.३० वाजता, अमरधाम, नालेगाव येथे होईल.**

दुःखांकित : श्रीमती सुभद्राबाई रंगनाथ जाधव (आजी)
बाबुराव रंगनाथ जाधव (चुलते) । शंकर रंगनाथ जाधव (चुलते)
विठ्ठल रंगनाथ जाधव (चुलते) । पांडुरंग रंगनाथ जाधव (चुलते)
श्रीमती अलका भाऊसाहेब फुलसौंदर (आत्या) । राहुल आनंदा जाधव (भाऊ)
श्रीमती अंजली गणेश जाधव (पत्नी) । कु.विश्वजा गणेश जाधव (मुलगी)
चि.हर्षवर्धन गणेश जाधव (मुलगा)

स्व. नागेश (पप्पू) जाधव प्रतिष्ठाण (ट्रस्ट)
स्व. विकीभैय्या फुलसौदर मित्र मंडळ । स्व. सारंग जाधव मित्र मंडळ
बालिकाश्रम रोड, जाधव मळा, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती आमचे अशिलांचे मालकी वहिवाटीच्या आहेत. सदर मिळकतीचे ७/१२ पत्रकी शेख मुन्वर चाँदमिया, शेख अब्दुल समद चाँदमिया, शेख अख्तर चाँदमिया, शेख अब्दुल हमीद चाँदमियाँ यांचे नावे नमूद आहेत. शेख मुन्वर चाँदमिया, शेख अब्दुल समद चाँदमिया, शेख अख्तर चाँदमिया, शेख अब्दुल हमीद चाँदमियाँ हे मिळकतीचे ७/१२ पत्रकी असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेऊन सदर मिळकतीचे हस्तांतर करण्याचे प्रयत्नात आहेत. तशी खात्री लायक माहिती आमचे अशिलांना मिळालेली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत शेख मुन्वर चाँदमिया, शेख अब्दुल समद चाँदमिया, शेख अख्तर चाँदमिया, शेख अब्दुल हमीद चाँदमियाँ, रा. दर्गा दायरा, नागरदेवळे, ता. नगर, जि. अहिल्यानगर यांचे बरोबर अगर त्यांचे वतीने अन्य तिऱ्हाईत इसमाबरोबर परिशिष्टात नमूद मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा / हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. केल्यास त्यांना मिळकतीची मालकी व ताबा मिळणार नाही. सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही कोणत्याही प्रकारची फसगत होऊ नये म्हणून हि जाहीर नोटीस प्रसिध्दीस दिली असे. कळावे

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** :- तुकडी अहमदनगर, पोट तुकडी तालुका नगर, जिल्हा परिषद अहमदनगर, तालुका पंचायत समिती नगर यांचे हद्दीतील ग्रामपंचायत गाव **मौजे नागरदेवळे** येथील शेत जमीन मिळकत **गट क्रमांक** - ८९/१ चे **क्षेत्र** - ० हे. ७६ आर + पोट खराबा ०हे. ०२ आर, **आकार** १५रु ५२ पैसे तसेच **गट क्रमांक** -८९/२ चे क्षेत्र - ०हे. १० आर, **आकार** - ०२रु ०४ पैसे यांसी चतु:सिमा सरकारी रेकॉर्ड प्रमाणे यातील वागणूकीचे व वहिवाटीचे हक्कांसह तदंगभुत वस्तुंसह खाली काहीएक राखून न ठेविता.

अहमदनगर
ता. १५/११/२०२४

**ॲड. भाऊसाहेब पंढरीनाथ फसले**
ऐतिहासिक वस्तु संग्रहालयाजवळ,
हातमपुरा, अहमदनगर मो.नं. ९६५७६०९०४६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १५/११/२०२४

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे निमगांव वाघा** येथील खालील वर्णनाची जिरायत शेतजमीन मिळकत -

| गट नंबर | | क्षेत्रफळ हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४९६ | | ०.८४ | १.६९ |
| | पोट खराबा | ०.०१ | |
| | एकूण | ०.८५ | |

यापैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे दक्षिणेकडील बाजूचे संपूर्ण क्षेत्र ० हे. ४० आर ही आहे त्या स्थितीत संपूर्ण मिळकत.

**यांसी चतु:सीमा** -

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | गट नंबर ४९३ |
| दक्षिणेस | : | शासकीय रस्ता |
| पश्चिमेस | : | लागू रस्ता |
| उत्तरेस | : | गट नंबर ४९६पैकी जपकर यांचे क्षेत्र |

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक-**
**कल्पना अजित लोढा**
रा. पुनममोतीनगर, अहमदनगर.

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहमदनगर

## डॉ.योगेश सिसोदिया (M.S.ORTHO)

**गुडघेदुखी, सांध्याचे आजार, लिगामेंट व स्पोर्टस् इंज्युरी तज्ञ.**

संलग्न हॉस्पिटल
संचेती हॉस्पिटल (पुणे) । साईदीप हॉस्पिटल (नगर) : दर शनिवारी
अहमदनगर व्हिजीट : **साईदीप हॉस्पिटल**
दर शनिवारी : वेळ सकाळी १० ते १२ (अपॉईंटमेंट साठी संपर्क)
**9860267116 / 7387393683**



२२५ - अ.नगर शहर विधानसभा मतदार संघ
महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार
**अभिषेक बाळासाहेब कळमकर** (MBA)
यांच्या प्रचारार्थ
संसदरत्न खासदार
**डॉ.अमोल कोल्हे**
यांचा

**युवा निर्धार मेळावा**

शनिवार, दिनांक
**16 नोव्हेंबर 2024**
वेळ : **दुपारी 1** वाजता
स्थळ : **विशाल गणपती माळीवाडा,** अ.नगर

इन्स्टाग्राम वर मला भेटण्यासाठी स्कॅन करा!



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर<br>Abhishek Balasaheb Kalamkar | | |

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

प्रकाशक : निलेश मालपाणी, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)